| लातूर | वर्ष ३५ वे | अंक ५५ वा | बुधवार, दिनांक १३ मे २०२६ | पृष्ठे ६ | किंमत १ रू.

RNI 47034/64

# लातूर समाचार

LATUR SAMACHAR

(सांज दैनिक)

प्रकाशन: लातूर

पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

Email-dainiklatursamachar@gmail.com

संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक) कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

## पेपरफुटीचे लातूर कनेक्शन? मॉक टेस्टमध्ये दिलेले तब्बल ४२ प्रश्न जशाच्या तसे..

**लातूर/प्रतिनिधी:** नीट युजी २०२६ पेपरफुटी प्रकरणात नाशिकनंतर आता लातूरचे नाव समोर येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. एका विद्यार्थिनीच्या पालकांनी दिलेल्या लेखी तक्रारीनंतर लातूर पोलिसांनी एका खासगी क्लासेसची चौकशी सुरू केली आहे. मॉक टेस्टमध्ये दिलेले तब्बल ४२ प्रश्न प्रत्यक्ष नीटपरीक्षेत जशाच्या तसे आल्याचा दावा तक्रारीत करण्यात आला आहे. या तक्रारीमुळे संबंधित क्लासेसचा पेपरफुटी प्रकरणाशी काही संबंध आहे का, याचा तपास सुरू करण्यात आला असून राज्यभरात याची मोठी चर्चा सुरू झाली आहे.

**पालकांच्या तक्रारीनंतर पोलिसांचा तपास**

एका विद्यार्थिनीच्या पालकांनी १२ मे रोजी लातूर पोलीस अधीक्षक कार्यालयात प्रत्यक्ष उपस्थित राहून लेखी तक्रार दिली. या तक्रारीत, परीक्षा होण्यापूर्वी खासगी क्लासेसने दिलेल्या मॉक टेस्टमधील ४२ प्रश्न नीट युजी २०२६ च्या प्रत्यक्ष प्रश्नपत्रिकेत आल्याचा दावा करण्यात आला.

**पोलीस अधीक्षकांचे चौकशीचे आदेश दिले**

या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी उपविभागीय पोलीस अधिकारी समरजीत साळवे यांना तातडीने चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत. चौकशीनंतर दोषी आढळल्यास संबंधितांविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे असे समजते.

**अनेक नामांकित क्लासेसचा समावेश**

अनेक नामांकित क्लासेसमध्ये नीट परीक्षेचे प्रश्न विद्यार्थ्यांना देण्यात आले. त्यामध्ये लातूरमधील दोन तर पुण्यातील एका क्लासने नीट परीक्षेत विचारण्यात आलेले काही प्रश्न दिल्याचे विद्यार्थ्यांनी सांगितले. खासगी कोचिंग क्लासेसने पेपर फोडण्याचे कारस्थान रचले, अशी माहिती पालकांनी प्रतिनिधीस यांनी दिली.

**लातूर पोलीसाचे नागरिकांना आवाहन**

लातूर जिल्ह्यामध्ये नीट युजी २०२६ पेपर फुटीच्या अनुषंगाने आपल्याकडे काही महत्त्वाची माहिती व पुरावे असल्यास आपण उपविभागीय पोलिस अधिकारी शहर समीरसिंह साळवे (९१४५११९०४९) यांना संपर्क करावा. असे आवाहन करण्यात आले आहे.

## जुन्या भांडणावरून लोखंडी पाईपने मारहाण

**लातूर/प्रतिनिधी:** जुन्या भांडणाच्या कारणावरून फिर्यादी व फिर्यादीच्या भाच्यास शिवीगाळ करत लोखंडी पाईपने मारहाण केल्याची घटना शहरातील म्हाडा कॉलनीत सोमवारी (दि. ११) रात्री साडेआठ वाजता घडली. याप्रकरणी दोघांवर विवेकानंद चौक पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल आहे.

फिर्यादी बालाजी देवीदासं गायकवाड (रा. म्हाडा कॉलनी, लातूर) व त्यांच्या भाच्यास राहुल चंद्रकांत वाघमारे व इतर एकाने शिवीगाळ केली तसेच दोन्ही हात पकडून पोटात लाथाबुक्क्या मारून जखमी केले व लोखंडी पाईपने मारून जिवे मारण्याची धमकी दिली. याप्रकरणी गुन्हा दाखल असून, पोलीस नाईक डिगे अधिक तपास करीत आहेत. जखमीवर उपचार सुरू आहेत.

## रोहित पवार यांच्या दाव्याने राजकारणात खळबळ

### बावीस आमदार घेऊन सुनील तटकरे आणि प्रफुल पटेल भाजपमधून लढणार





**पुणे/प्रतिनिधी:** राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष आणि खासदार सुनील तटकरे यांनी मंगळवारी रात्री शरद पवार यांची भेट घेतल्याने राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे. मात्र शरद पवारांसोबतची भेट ही केवळ तब्येतीची विचारपूस करण्यासाठी होती, असे सुनील तटकरेंनी स्पष्ट केले. परंतु आता शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी खळबळजनक दावा केला आहे.

२२ आमदार घेऊन सुनील तटकरे आणि प्रफुल्ल पटेल हे भाजपमधुनच लढणार आहेत. एकनाथ शिंदेंच्या पक्षाचे देखील काही आमदार भाजपच्या गळाला लागले आहे, असा दावा रोहित पवारांनी आज पत्रकार परिषद घेऊन केला. मावळचा आमदार (सुनिल शेळके ) भाजपमधूनच लढणार आहेत, असा मोठा दावा रोहित पवारांनी केला आहे. तसेच शरद पवारांसोबतच्या भेटीवर सुनील तटकरेंना कदाचित सिल्व्हर ओकचा चहा आवडत असेल, असा टोलाही रोहित पवारांनी लगावला.

मंगळवारी आदरणीय शरद पवार साहेबांची त्यांच्या सिल्व्हर ओक या निवासस्थानी सदिच्छा भेट घेतली, प्रकृतीची विचारपूस केली. गेल्या काही काळात साहेबांची तब्येत ठीक नव्हती, त्याकरता ते ब्रीचकँडी रुग्णालयात उपचारासाठी दाखल झाले होते. तेव्हापासून त्यांच्या भेटीसाठी जाण्याचे प्रयोजन होते, परंतु मधल्या काळात वेळ जुळून येत नसल्याने ही भेट अखेरीस काल झाली. या भेटीत कुठल्याही राजकीय विषयांवर चर्चा झाली नाही, तसा कुठला उद्देशही या भेटीचा नव्हता. गेली सहा दशके साहेब देशाच्या राजकारणात महत्वाचे योगदान देत आहेत. मी दीर्घकाळ त्यांच्या मार्गदर्शनाखाली काम केले, माझ्या राजकीय जडणघडणीत त्यांचा मोठा वाटा आहे. त्यामुळे भेट देणे, तब्येतीची विचारपूस करणे हा महाराष्ट्राच्या राजकारणापलीकडच्या समृद्ध राजकीय परंपरेचा भाग आहे. या परंपरेला अनुसरूनच ही भेट झाली. साहेबांची प्रकृती आता उत्तम असून त्यांची काम करण्याची ऊर्जा पूर्वीसारखीच आजही कायम आहे, असं सुनील तटकरे एक्सवर पोस्ट करत म्हणाले.

**राष्ट्रवादीचे आमदार आम्ही फोडणार नाही. देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट सांगितले**

राष्ट्रवादीचे आमदार आम्ही फोडणार नाही, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले होते. राष्ट्रवादी काँग्रेसच्या आमदारांमध्ये सुरुवातीला असुरक्षितता होती. पण उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार काम करत आहेत, दृढता दिसते. महिना दोन महिन्यात पक्ष स्थिरस्थावर होईल. त्यांच्या पक्षातील कोणालाही आम्ही आमच्या पक्षात घेणार नाही. राष्ट्रवादीचे आमदार फोडणार नाही. पण त्यांच्या पक्षाला जी मदत लागेल ती करू, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले होते.

## जोसेफ विजय फ्लोअर टेस्टमध्येही पास!



**चेन्नई/वृत्तसेवा:** तमिळनाडू विधानसभेत बुधवारी झालेल्या विश्वासदर्शक ठरावादरम्यान तमिळगा वेत्री कळघम (TVK) सरकारला १४४ आमदारांचं पाठबळ मिळाले. फ्लोअर टेस्टच्या कामकाजादरम्यान काँग्रेस, सीपीआय(एम), व्हीसीके आणि इंडियन युनियन मुस्लिम लीग (आययूएमएल) यांनी विजय यांच्या नेतृत्वाखालील सरकारला पाठिंबा दिला. तर, AIADMK च्या बंडखोर आमदारांनीही विजय यांना पाठिंबा दिला आहे. काँग्रेसने आपल्या पाच आमदारांसह सरकारला पाठिंबा दिला, तर सीपीआय(एम), व्हीसीके आणि आययूएमएल या पक्षांच्या प्रत्येकी दोन आमदारांनीही समर्थन दिलं. अम्मा मक्कल मुन्नेत्र कळघम मधून हकालपट्टी झालेले आमदार एस कामराज यांनीही सरकारच्या बाजूने मतदान केले, परिणामी युतीचे संख्याबळ १२० जागांवर पोहोचले. हे विधानसभेतील बहुमताच्या आकड्यापेक्षा खूप जास्त आहे.

तर, 'बंडखोर' नेते षन्मुगम आणि एसपी वेळुमणी यांच्या नेतृत्वाखालील अण्णाद्रमुक (AIADMK) पक्षातील ४७ पैकी किमान २५ आमदारांनी मुख्यमंत्र्यांच्या बाजूने मतदान केले.

## दोघांना बेल्टने मारहाण

**लातूर/प्रतिनिधी:** येथील साई मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्यावरील इस्कॉनने विकसित केलेल्या मंदिराजवळ थांबलेलेल्या फिर्यादी प्रणव विलास यांच्यासह त्यांच्या मित्रांना तुम्ही इथे का थांबलात, असे म्हणत आरोपी अभी कातळे व त्याच्यासोबतच्या अन्य तीन मित्रांनी कमरेचा पट्टा व काठीने बेदम मारहाण करून जखमी केले.

यापुढे इथे दिसल्यास जीवे मारून टाकण्याची धमकी दिल्याप्रकरणी चार आरोपींविरोधात एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास एमआयडीसी पोलीस करीत आहेत.

## नाशिक टीसीएस प्रकरण

## एमआयएम नगरसेवक मतीन पटेलच्या घरावर महापालिकेचा 'बुलडोझर'

**छत्रपती संभाजीनगर :** नाशिकच्या 'टीसीएस' प्रकरणातील आरोपी निदा खान हिला मदत केल्याच्या अरोपानंतर एमआयएम नगरसेवक मतीन पटेलच्या अवैध घरावर महापालिकेने बुधवारी 'बुलडोझर' कारवाई केली. सकाळी सहा वाजता त्याचे घर जेसीबी लावून पाडण्यात आले.

सकाळी सहा वाजता महापालिकेने पोलीस बंदोबस्तामध्ये ही कारवाई केली. त्याचे कार्यालय आणि दोन निवासस्थांना महापालिकेने नोटीस बजावून कागदपत्रे सादर करण्यासाठी ७२ तासाचा वेळ दिला होता. या नोटिसीच्या विरोधात नगरसेवक पटेल याने उच्च न्यायालयात धाव घेतली होती. मात्र, उच्च न्यायालयाने कारवाईला स्थगिती दिली नाही, असे सांगत महापालिकेने ही कारवाई केली. यात नारेगावमधीगल ज्या घरात निदा खान हिला लपविण्यात आले होते ते घर मतीन



पटेल याच्या नावावर नव्हते. मतीन पटेल या एमआयएमच्या नगरसेवकाने धर्मांतरास प्रोत्साहन देण्याच्या आरोपाखाली अटक करण्यात आलेल्या निदा खान हिस मदत केली होती. नारेगावमधील एका घरात निदा खान, तिची मावशी व बहीण यांना ठेवण्यात आले होते. या प्रकरणी नाशिक पोलिसांनी मतीन पटेल यास सहआरोपी केले आहे.

## औसा मतदारसंघातील १० तीर्थक्षेत्रांना 'क वर्ग' दर्जा



**औसा/प्रतिनिधी:** औसा विधानसभा मतदारसंघातील धार्मिक, सांस्कृतिक आणि आध्यात्मिक परंपरेला बळ देणारा अत्यंत महत्त्वपूर्ण निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. भाविकांच्या श्रद्धास्थानांचा सर्वांगीण विकास व्हावा तसेच गावागावातील मंदिर व तीर्थक्षेत्रांना मूलभूत सुविधा उपलब्ध व्हाव्यात, या उद्देशाने औसा मतदारसंघातील तब्बल १० तीर्थक्षेत्रांना क वर्ग दर्जा मंजूर करण्यात आला आहे. या निर्णयामुळे परिसरातील धार्मिक पर्यटन, विकासकामे आणि भाविकांच्या सुविधांना मोठी गती मिळणार आहे.

दि. ११ फेब्रुवारी २०२६ रोजी झालेल्या लातूर जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत औसाविधानसभा मतदारसंघाचे आमदार अभिमन्यू पवार यांनी पालकमंत्री शिवेंद्रराजे भोसले यांच्याकडे विविध तीर्थक्षेत्रांना क वर्ग दर्जा देण्याची मागणी केली होती. या मागणीची सकारात्मक दखल घेत शासनाने हा महत्त्वपूर्ण निर्णय जाहीर केला. क वर्ग दर्जा प्राप्त झालेल्या तीर्थक्षेत्रांमध्ये हनुमान मंदिर देवस्थान (ब्राह्मण गल्ली, औसा), गजानन महाराज मंदिर (औसा), तक्षशिला बौद्ध विहार (औसा), गोपाळबुवा देवस्थान (माळकोंडजी), हनुमान मंदिर देवस्थान (याकतपूर), व्यंकटेश बालाजी मंदिर देवस्थान (दावतपूर), नृसिंह मंदिर देवस्थान (फत्तेपूर), खंडोबा मंदिर देवस्थान (आशिव), तुकाराम महाराज देवस्थान (हासुरी बु., ता. निलंगा) तसेच संत सेवालाल महाराज देवस्थान (एकंबी तांडा) यांचा समावेश आहे. या निर्णयामुळे संबंधित तीर्थक्षेत्रांमध्ये रस्ते, पिण्याचे पाणी, स्वच्छता, निवास व्यवस्था, प्रकाश व्यवस्था आणि इतर मूलभूत सुविधा विकसित करण्यासाठी शासन स्तरावर निधी उपलब्ध होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. त्यामुळे भाविकांना अधिक सोयीसुविधा मिळणार असून धार्मिक पर्यटनालाही चालना मिळणार आहे. औसा मतदारसंघातील श्रद्धा, संस्कृती आणि विकास यांचा सुंदर संगम घडवणारा हा निर्णय निश्चितच ऐतिहासिक मानला जात आहे. ग्रामीण भागातील धार्मिक स्थळांच्या विकासामुळे स्थानिक अर्थव्यवस्थेलाही हातभार लागणार असल्याची भावना नागरिकांमधून व्यक्त होत आहे. या मागणीची दखल घेऊन सकारात्मक निर्णय घेतल्याबद्दल पालकमंत्री शिवेंद्रराजे भोसले यांचे आमदार अभिमन्यू पवार यांनी आभार मानले असून, भविष्यातही मतदारसंघातील विकासकामांना प्राधान्य दिले जाईल, असा विश्वास व्यक्त केला आहे.

## प्रभात किरणे

श्रद्धा अंधश्रद्धा न कळे फरक
ऐकून अंधाधुंदी, जणू ती मेंढरी
दुःख दारिद्र्य लाचारीचा जगणं
शुद्ध ठेवावे मना या तन मंदिरी
- इंजि. नागनाथ कलवले, लातूर
+९१ ९७६४७ ८८२८८

## राष्ट्रीय लोकअदालतीत ५९५ प्रकरणे काढली निकाली

**लातूर/प्रतिनिधी:** राष्ट्रीय विधि सेवा प्राधिकरण, राज्य विधि सेवा प्राधिकरण यांच्या आदेशानुसार जिल्हा व सत्र न्यायालय लातूर येथे प्रलंबित वादपूर्ण प्रकरणांचा करण्यासाठी निपटारा शनिवारी लोक अदालत झाली. यात ५९५ प्रलंबित प्रकरणे व ४० दावापूर्व प्रकरणे निकाली काढण्यात आली आहेत. यामध्ये एकूण ६ कोटी ९ लाख २४ हजार रुपये तडजोडीने पक्षकाराला मिळाले आहेत. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश न्या. एस.जे. भारुका यांच्या मार्गदर्शनात प्रलंबित प्रकरणांसाठी दहा पॅनल व वादपूर्व प्रकरणासाठी एक असे अकरा पॅनल करण्यात आले होते. या ठिकाणी संबंधित प्रकरणांचा निपटारा करण्यात आला. यात मोटार अपघात, नुकसानभरपाई प्रकरणे, कौटुंबिक न्यायालय, भूसंपादन, कौटुंबिक हिंसाचार प्रकरणे, हिंदू विवाह कायद्यांतर्गत प्रकरणे, कोर्टात प्रलंबित असलेली तडजोडपात्र दिवाणी व फौजदारी प्रकरणे ठेवण्यात आली होती.

## कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



नीट २०२६ ची परीक्षा रद्द, सीबीआय चौकशीचे आदेश..

## चिमटा दयाचा



लातूरमध्ये श्वानाला पकडण्याची मोहिम सुरु केली आहे !
हा ठराविक दिवसाचा देखावा आहे.....!!

## हेल्मेट, सीट बेल्टचा वापर 'न' केल्यामुळे गेला अनेकांचा जीव

**लातूर/प्रतिनिधी:** लातूर जिल्ह्यातील रस्ते अपघातात गाडी चालवताना हेल्मेट न वापरल्यामुळे व कारमध्ये असताना सीट बेल्टचा वापर न केल्यामुळे शेकडो जणांना आपला प्राण गमवावा लागला आहे. जीवन हे अमुल्य असून त्याची भरपाई कशातही होऊ शकत नाही हे वास्तव ओळखून वाढत्या रस्ते अपघातांच्या पार्श्वभूमीवर वाहन चालकांनी सीटबेल्ट व हेल्मेटचा वापर करावा, असे आवाहन पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी केले आहे.

लातूर जिल्ह्यात २०२५ मध्ये एकूण ८४९ रस्ते अपघातांची नोंद झाली असून त्यामध्ये ३८४ जणांचा मृत्यू झाला आहे, तर ५६० जण गंभीर व किरकोळ जखमी झाले आहेत. यापैकी दुचाकी वाहनांचे २९७ अपघात झाले असून २४० जणांचा मृत्यू झाला आहे. या पार्श्वभूमिवर लातूर पोलीस दलाने केलेल्या शास्त्रोक्त विश्लेषणातून प्रामुख्याने चारचाकी वाहन चालवत असताना वाहन चालकाने आणि सहप्रवाशाने सीटबेल्टचा वापर न केल्यामुळे आणि दुचाकी वाहन चालक आणि सहप्रवासी यांनी





हेल्मेटचा वापर न केल्यामुळे गंभीर किंवा प्राणांतिक अपघात झाल्याचे लातूर निदर्शनास आलेले आहे.

हीच गंभीर व प्राणांतिक अपघातांची प्रमुख कारणे असल्याचे स्पष्ट झाले आहे.यामुळे सर्व नागरिकांनी वाहन चालविताना सीटबेल्ट व हेल्मेटचा नियमित वापर करून सुरक्षित प्रवास करावा, असे आवाहनही करण्यात पोलीस अधिक्षक अमोल तांबे यांनी केले आहे.

**सीट बेल्ट ठरला जीवन रक्षक हा घ्या पुरावा**

२९ मे रोजी बोरफळ येथे कारचा भीषण अपघात झाला होता. कारने दोन वेळा पलटी घेतली होती कारमध्ये प्रवासी व कारचालकाने सीट बेल्ट लावले होते. परिणामी असा अपघात होऊनही किरकोळ दुखापत वगळता कसलीही जीवितहानी झाली नाही.

## गटारात आढळले नवजात अर्भक



ऐआय ईमेज

**हुलसूर/प्रतिनिधी:** हुलसूर तालुक्यातील गडीगौंडगाव येथे मानवतेला काळिमा फासणारी हृदयद्रावक घटना उघडकीस आली आहे. गावातील बसवेश्वर सर्कल परिसरातील एका किराणा दुकानाजवळील गटारात नवजात अर्भकाचा मृतदेह आढळून आल्याने गावात संताप आणि हळहळ व्यक्त होत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, रविवारी सकाळच्या सुमारास काही स्थानिक नागरिक गटाराजवळ गेले असता त्यांना नवजात बाळाचा मृतदेह दिसून आला. या घटनेची माहिती तत्काळ हुलसूर पोलिसांना देण्यात आली. माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. प्राथमिक अंदाजानुसार, बाळाचा जन्म लपवण्याच्या उद्देशाने अज्ञातांनी रात्रीच्या वेळी नवजात अर्भकाला गटारात फेकून दिल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदनासाठी शासकीय रुग्णालयात पाठवला आहे. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून, संबंधितांचा शोध घेण्यासाठी पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

लातूर समाचार

## काटकसरीची सुरवात स्वत: पासून करावी

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नुकतीचे काटसरीने वागण्याचे आवाहन केले. पेट्रोल-डिझले बरोबर गॅसचा वापर काटकसरीने करण्याचे आवाहन केले आहे. त्यांच्या आवाहनास प्रतिसाद मिळत आहे. सोने खरेदी न करण्याचे आवाहन केले आहे. यामागे मोठे राज आहे. वास्तविक त्यांच्या आवाहनास नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळण्याची शक्यता आहे. यापुर्वी असे आवाहन केल्यावर नागरिकांनी त्याला प्रतिसाद दिला होता. याही आवाहनास नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळण्याची शक्यता आहे. वास्तविक हे भावनिक आवाहन जनतेला केले आहे. राज्य सरकारमधील व्यक्तींला नव्हे का? राज्यात अनेक मंत्री, आमदार व खासदार आहेत. त्याच्याकडे अनेक चार चाकी आहेत. स्वत:च्या मालकीच्या किती व सरकारी किती आहेत याचा आढावा घेवून तो जनतेसमोर सादर केला पाहिजे. त्यांचा दररोजचा खर्च किती येतो याचा तपशील जनतेला कळाला पाहिजे. त्यांना देण्यात येणाऱ्या सुविधेबाबतही तपशील जनतेसमोर वर्षातून एकदा सादर केला पाहिजे. जनतेला गॅसची सबसिडी सोडावी असे आवाहन पंतप्रधान मोदीजी यांनी करताच अनेकांनी सोडली होती. आताही जनता पेट्रोल व डिझेलचा वापर ही कमी करतील, मात्र आमदार, मंत्री किंवा खासदार त्याच प्रमाणे सरकारी अधिकारी किती याचा अमलकरतील याचा विचार केला पाहिजे. उठसुट गोरगरीब, सामान्य जनतेला भावनिक आवाहनात आडकून ठेवले जात आहे हे योग्य नाही. वास्तविक तसे पाहिले तर युद्ध चालू आहे. इंधनाची कमतरता भासणार आहे. सोने खरेदी थांबविली तर माजलेल्या देशाला चपकराक बसणार आहे हे काही चुकीचे नाही. भावनिक आवाहनास सामान्यास आडकविणे हे योग्य नाही. मंत्र्यांना दोन गाड्या, आमदार व खासदारांना एक गाडी बस आहे. अधिकारी वर्गाला एक गाडी ठिक आहे. नियम पाळायाचे गोरगरीब व सामान्यांनी बाकीच्यांची देश खायचा का? हे योग्य नाही. देशातील नागरिकांनी आता पर्यंत पंतप्रधानाचे एकले आहे. ज्यावेळी देशात अन्नधान्याची कमतरता भासली त्यावेळी माजीपंतप्रधान दिवंगत लालबहादुर शास्त्री यांनी एकवेळा जेवन भोजन कमी केले. रात्री धुतलेली टोपी तशीच दुसऱ्यादिवशी घालून संसदेत उपस्थित राहात होते. त्यांच्याकडे किती बँक बॅलेंस होते. नुकतेच माजी राष्ट्रपती एपीजे अब्दुल कलाम यांच्या किती संपत्ती व बँक बॅलेंस होते? ह्या बाबी देशातील सर्वच नागरिकांना माहिती आहेत. असे असताना पंतप्रधान यांनी पहिल्यांदा आपल्यापासून सुरवात केली पाहिजे. आपल्या मंत्रीमंडळातील सदस्यांना काटसरीचे धोरण अमलबजावणी करण्यात भाग पाडले पाहिजे. त्यांची अर्धी पेंशन पंतप्रधान निधीस जमा करण्यात सुरवात केली पाहिजे. सध्याला मंत्र्याचा पगार, माजी मंत्री, माजी आजी व आजी आमदार व खासदारांना किती सवलती व मानधन मिळते याचा आकडा जाहिर होणे अपेक्षित आहे. काटकसर केली पाहिजे यात देशातील नागरिकांचे दुमत नाही. असे जरी असले तरी सर्वांनी मिळून काटकसर केली पाहिजे. सर्वांनी संकटावर मात करण्यासाठी पुढे आले पाहिजे. ते दिसून येत नाही. आता देशात परिस्थिती युद्धामुळे काय दर्शवितो याचा अंदाज आला आहे. महागाई वाढली असली तरी प्रत्यक्षात गोरगरीब व जनसामान्य मध्यमवर्ग हा त्रासला आहे. मोठा वर्ग आनंदात दिसून येत आहे. अफाट संपत्ती आहे. धन आहे. कमाईचे साधणे अनेक आहेत त्यांना कधीही झळ पोंहचत नाही. हे लक्षात घेता जेथे भाजपाचे सरकार आहे तेथील मुख्यमंत्री सह मंत्री आमदार, नेते व कार्यकर्त्यांनी विचार काटकसरीचे धोरण स्विकारले पाहिजे. केवळ जनतेवर लादणे योग्य नाही. पगारी म्हणजे सॅलरी रोखली जाते कोणाची? असे धोरण असेल तर इतरांना सांगण्याचा तसा अधिकार पोंहचत नाही. मंत्रीमंडळातील सदस्यांनी चार चाकी गाडी वापरणे सोडली तर काय होईल, तर जनतेत सकारात्मक संदेश जाईल. एक ग्रामीण भागात म्हण आहे ''इतरांना सांगे ब्रह्मज्ञान, आपण मात्र कोरडे पाषण'' असे या बाबतीत होवू नये. मुळात अनेक नागरिक गाड्या वापरणे सोडतील. अनेक सोने खरेदी करणार नाहीत. असही देशभक्त आपल्या देशात आहेत हे मान्यच केले पाहिजे. देशविरोधात बोटावर मोजण्याइतकी मंडळी आहे. त्यांना वटणीवर आणण्यासाठी अधिक वेळ लागणार नाही. असो. पंतप्रधान यांनी काटकसरीने वागण्याचे दोनदा आवाहन केले आहे याला नागरिकांनी प्रतिसाद दिला पाहिजे. जे सांगतात ते देशासाठी सांगतात. त्यामुळे या काटकसरीचा अंमल गल्ली पासून दिल्ली पर्यंत झाला पाहिजे. केवळ दिल्ली सोडून गल्लीतील जनतेकडून अपेक्षा व्यक्त करीत असाल ते योग्य नाही. त्यामुळे सर्वांनी काटकसरीचे धोरण स्विकारले पाहिजे. आजही सरकारी कार्यालयात जावा, प्रशासकिय इमारतीत जावा. कार्यालयात कोणीही नसताना पंखे, दिवे व संगणक चालू दिसतील. कार्यालयात एक शिपाई बाकीचे नसतात. शासकिय पैशाची उधळपट्टी दिसून येते. सरकारचा पैसा हा जनतेचा असतो. जनतेनी कर रूपाने दिलेला असतो. शासाकिय मालमत्ता ही नागरिकांची समजली जाते. यातही गैरप्रकार वरिष्ठांना दिसून येत नाही का? जनतेचे सेवक असताना एसी रूम मध्ये हवा खाताना दिसतात. दरवाजाला जाड पडदा कशासाठी? असो पंतप्रधानाचे आवाहनास साथ दिली पाहिजे, मात्र याची सुरवात दिल्ली पासून झाली पाहिजे. राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी या बाबत सकारात्मक पावले उचलली पाहिजेत. देशातील नागरिकांनी विचार करून काटकसरीने वागण्यात सुरवात करावी जेणे करून एक सकारात्मक परिणाम लवकरच दिसून येईल. याची सुरवात सांगणाऱ्यांनी सुद्धा स्वत:पासून केली तरच ईतर याचा अंमल करतील मात्र या बाबत सुरवात ही प्रत्येकाच्या स्वत:पासून होणे अपेक्षित आहे.

# भग्न दगडांपासून अखंड श्रद्धेपर्यंत : सोमनाथची गाथा

ब्रिजेश सिंह, प्रधान सचिव तथा महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर लवकरच, १३ नोव्हेंबर १९४७ रोजी तत्कालीन केंद्रीय गृहमंत्री आणि उपपंतप्रधान सरदार वल्लभभाई पटेल सोमनाथ येथे गेले. समुद्रकिनारी उभे राहून त्यांनी मंदिराच्या भग्नावशेषांकडे गंभीर नजरेने पाहिले आणि एक प्रतिज्ञा केली सोमनाथ मंदिराच्या पुनर्निर्माणाची. तो क्षण म्हणजे भारताच्या सांस्कृतिक पुनर्जागरणाचा पहिला मोठा जागर; आपल्या सभ्यतेच्या स्वाभिमानाच्या सार्वजनिक पुनर्प्राप्तीचा क्षण होता.

आणि आता, ११ मे रोजी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सोमनाथ अमृत महोत्सवात उपस्थित राहून मंदिराच्या पुनर्स्थापित तेजात सहभाग घेतला, तेव्हा तीच प्रतिज्ञा पुन्हा नव्याने प्रज्वलित झाल्यासारखी वाटते. विशेष महापूजा, कुंभाभिषेक, ध्वजारोहण आणि लाखो भाविकांची उपस्थिती–हे सर्व मिळून भग्नावस्थेतून पुनर्निर्माणाकडे आणि पुनरुत्थानाकडे झालेल्या अखंड प्रवासाची घोषणा करतात. सरदार पटेलांच्या दूरदृष्टीपासून आजच्या आत्मविश्वासपूर्ण भारतापर्यंतचा हा अखंड सांस्कृतिक प्रवाह आहे. ही परंपरा, कालातीत आणि प्रेरणादायी, प्रत्येक पिढीला आपल्या वारशाचे जतन करण्याचे, ऐक्याचे रक्षण करण्याचे आणि भारताच्या सनातन आत्म्यावर दृढ श्रद्धा ठेवत समृद्ध, सुसंवादी आणि अखंड भविष्याकडे वाटचाल करण्याचे आवाहन करते.

अमेरिकन लेखक मार्क ट्वेन यांनी एकदा म्हटले होते की वाराणसी इतिहास, परंपरा आणि आख्यायिकांपेक्षाही प्राचीन आहे. पण कदाचित त्यांनी प्रभास पाटण आणि सोमनाथ पाहिले नसावे. भागवत पुराणानुसार, चंद्राला त्याचे सासरे दक्ष यांनी शाप दिला होता. त्या शापातून मुक्त होण्यासाठी चंद्राने याच स्थळी भगवान शिवाची आराधना केली आणि म्हणूनच 'सोमनाथ–चंद्राचा अधिपती' हे नाव उदयास आले.

मंदिर उभे राहण्याच्या खूप आधीपासून प्रभास पाटण हे मानवी वस्तीचे केंद्र होते. इ.स.पू. ३००० पासून येथे शेती आणि पशुपालन करणारी पूर्व–हडप्पा संस्कृती अस्तित्वात होती. सिंधू संस्कृतीच्या ऱ्हासानंतरही येथे जीवन टिकून राहिले. येथे सापडलेली रेड पॉलिश्ड वेअर मातीची भांडी आणि प्रारंभीच्या लिपींचे पुरावे याची साक्ष देतात. इसवी सनाच्या प्रारंभीच्या शतकांत हे एक साधे पण महत्वाचे नगर होते. समुद्रकिनाऱ्यालगत ७ ते १० मीटर खोलीवर सापडलेले दगडी नांगर प्राचीन सागरी व्यापाराचे साक्षीदार आहेत. हा किनारा केवळ निसर्गरम्य नव्हता, तर व्यापाराचे प्रवेशद्वार होता. येथे वस्ती आणि पवित्रता एकत्र वाढत गेली.

प्राचीन ग्रंथांमध्ये प्रभास क्षेत्राला तीर्थ म्हणून संबोधले आहे. महाभारतामध्ये भगवान कृष्णाच्या देहत्यागाचे स्थळ म्हणून प्रभासाचा उल्लेख आहे. दगडांनी अमरत्वाची भाषा शिकण्यापूर्वीच हा किनारा सांसारिक आणि आध्यात्मिक जगामधील एक पवित्र संगम होता. त्याची प्रारंभीची रूपे साधी–लाकूड आणि गवताची–असली, तरी ती मानवी मनाच्या दैवी शोधाची खूण होती.

इ.स. ६४९ च्या सुमारास वल्लभीच्या मैत्रक राजवटीत पहिले ऐतिहासिकदृष्ट्या प्रमाणित मंदिर उभे राहिले. पुढे ९व्या–१०व्या शतकात चालुक्य/सोलंकी काळात सोमनाथ हे काशी आणि उज्जैनच्या बरोबरीचे प्रमुख तीर्थस्थान बनले. पुरातत्त्ववेत्ता बी. के. थापर यांना १९५०–५१ मधील उत्खननात असलेले गर्भगृह, अंतराळ आणि सभामंडप यांचा समावेश असलेली भव्य रचना. पूर्वाभिमुख त्रि–अंग संधार प्रासादाचे अवशेष सापडले. लक्षुलीश मूर्तीच्या अवशेषांनी त्याची शैव परंपरा सिद्ध केली. विद्वान मंदिराच्या नेमक्या कालखंडावर मतभेद करतात, परंतु एक गोष्ट निर्विवाद आहे–सोमनाथ त्या काळात अत्यंत वैभवशाली झाले होते आणि लवकरच त्याची कठोर परीक्षा होणार होती.

ही परीक्षा अनेक लाटांमध्ये आली. इ.स. ७२५ मध्ये उमय्यद सेनापती जुनैद इब्न अब्द अल–रहमान अल–मुरीने हल्ला केला, जो पहिला इस्लामी आक्रमण मानला जातो. परंतु सर्वात मोठा आघात ८ जानेवारी १०२६ रोजी झाला, जेव्हा गझनीचा महमूद आपल्या पंधराव्या मोहिमेत सोमनाथावर चालून आला. शिवलिंग फोडण्यात आले, खजिना लुटण्यात आला. अल बिरुनी यांनी मंदिरातील संपत्तीचे वर्णन केले आहे. सोने, चांदी, मोती, रत्ने आणि गावांच्या महसुलातून जमा झालेली संपदा.

तथापि, पुरातत्त्वीय पुरावे दर्शवतात की मंदिराचे भग्नावशेष त्वरित एकत्र करून सुरक्षितपणे पुरले गेले. म्हणजेच, श्रद्धा उद्ध्वस्त झाली नव्हती. इ.स. १०३८ मध्ये गोव्याच्या कदंब राजाने सोमनाथाला भेट दिली, यावरून पूजा–अर्चा किंवा पुनरुज्जीवनाची भावना त्वरित पुन्हा उभी राहिल्याचे दिसते. मंदिराचे रूप तुटले, पण संस्कृतीचे चेतन कायम राहिले.

पुढील काळातही विध्वंस आणि पुनर्निर्माण यांचे चक्र सुरूच राहिले. इ.स. ११६९ मध्ये सोलंकी राजा कुमारपालाने पाचवे भव्य दगडी मंदिर उभारले. प्रभास पाटण येथील भद्रकाली मंदिरातील शिलालेखात त्याचा उल्लेख आहे.

त्यानंतर १२९९ मध्ये अलाउद्दीन खिलजीचा सेनापती उलुघ खानने मंदिर उद्ध्वस्त केले. स्थानिक रक्षक वाजा मालसुत आणि पदमल यांनी मंदिररक्षण करताना प्राण दिले. पुढे चुडासमा राजा महिपाल देव यांनी १३०८ मध्ये मंदिराचे पुनर्निर्माण केले आणि त्यांचा पुत्र खेङ्गाराने शिवलिंगाची पुनःप्रतिष्ठा केली.

यानंतर झफर खानने १३९५ मध्ये मंदिर उद्ध्वस्त करून तेथे जामा मशिद आणि प्रशासकीय ठाणे उभारल्याचे उल्लेख आहेत. पुढे महमूद बेगडा, पोर्तुगीज आक्रमक, आणि नंतर औरंगजेब यांच्या आदेशाने १६६५ आणि १७०६ मध्ये पुन्हा विध्वंस घडवून आणण्यात आला. पुजाऱ्यांची हत्या, मंदिर परिसरातील अपवित्र कृत्ये आणि संपूर्ण रचना पाडण्याचे प्रयत्न झाले; परंतु तीर्थक्षेत्र टिकून राहिले.

जरी मंदिर वारंवार उद्ध्वस्त झाले, तरी स्मृती कधीच नष्ट झाली नाही. इ.स. १७८२–८३ मध्ये पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर यांनी आपल्या वैयक्तिक निधीतून सोमनाथाजवळ नवीन दगडी मंदिर उभारले. हे मंदिर १९व्या आणि २०व्या शतकात सोमनाथच्या श्रद्धेचे केंद्र राहिले.

१८४२ मध्ये ब्रिटिश गव्हर्नर–जनरल लॉर्ड एलेनबरो यांनी अफगाणिस्तानातील महमूद गझनीच्या कबरीतून चंदनाचे दरवाजे आणले आणि ते सोमनाथचे मूळ दरवाजे असल्याचा खोटा दावा केला. हा ब्रिटिश सत्तेचा हिंदू समाजाचे समर्थन मिळवण्यासाठी आणि ब्रिटिश राजवटीला वैध ठरवण्यासाठी राजकीय प्रचार होता. हे दरवाजे नंतर आग्रा किल्ल्यात ठेवण्यात आले.

१९२२ मध्ये के.एम. मुन्शी यांनी सोमनाथचे भग्नावशेष पाहिले. त्यांनी त्या अनुभवाचे वर्णन भक्ती आणि लज्जा असे केले आणि याच अनुभवातून त्यांच्या मनात मंदिर पुनर्निर्माणाची आजीवन बांधिलकी निर्माण झाली.

स्वातंत्र्यानंतर सोमनाथच्या इतिहासाचे अंतिम पर्व सुरू झाले. ऑक्टोबर १९४७ मध्ये जुनागढ भारतात विलीन झाले आणि हिंदूंना मंदिर दुरुस्तीवरील बंदी हटवण्यात आली. १२–१३ नोव्हेंबर १९४७ रोजी सरदार पटेल, एन. व्ही. गाडगीळ आणि जामसाहेब यांनी भग्नावशेषांना भेट दिली. तेव्हा पटेलांनी जाहीर केले: या शुभ नववर्षदिनी आम्ही सोमनाथ मंदिर पुनर्निर्माणाचा निर्णय घेतला आहे.

जुनागढ प्रशासन आणि जामसाहेबांनी तत्काळ देणग्या दिल्या. सुमारे ५,००० एकर जमीन मंदिर, संस्कृत विद्यापीठ आणि सांस्कृतिक केंद्रासाठी राखीव ठेवण्यात आली.

यानंतर वाद निर्माण झाला. महात्मा गांधींच्या सल्ल्यानुसार सरकारने थेट निधी न देता लोकवर्गणीतून मंदिर उभारण्याचा निर्णय घेतला, जेणेकरून हे राज्यप्राय धार्मिक प्रकल्प न राहता लोकसहभागातून उभे राहिलेले सांस्कृतिक पुनरुत्थान ठरेल.

दरम्यान, तत्कालीन प्रधानमंत्री जवाहरलाल नेहरु यांनी या प्रकल्पाला 'हिंदू पुनरुत्थानवाद' म्हणून विरोध केला. परंतु सार्वजनिक देणग्यांमुळे प्रकल्प थांबवता आला नाही.

१५ डिसेंबर १९५० रोजी सरदार पटेल यांचे निधन झाले, तरी काम सुरूच राहिले. अखेर ११ मे १९५१ रोजी राष्ट्रपती राजेंद्र प्रसाद यांच्या हस्ते प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. सोमपुरा शिल्पकारांनी बांधलेल्या मारू–गुर्जर शैलीतील मंदिरात नवीन ज्योतिर्लिंगाची स्थापना झाली. शतकानुशतके कुजबुजत राहिलेली प्रतिज्ञा अखेर दगडात साकार झाली. नेहरू या समारंभाला उपस्थित नव्हते.

आज सोमनाथ हे केवळ पर्यटनस्थळ किंवा धार्मिक प्रतीक नाही; ते दगड आणि गाळात लिहिलेले भारतीय संस्कृतीचा इतिहासग्रंथ आहे. त्याची खरी ओळख अखंड वैभवात नसून प्रत्येक विध्वंसानंतर पुन्हा उभे राहण्याच्या मानवी निर्णयात आहे.

त्याच्या पायाभूत थरांमध्ये हडप्पाकालीन वसाहती, प्राचीन व्यापारी आणि शांतीच्या शोधात आलेले भक्त सामावलेले आहेत. प्रत्येक पुनर्निर्माण–मैत्रक राजे, सोलंकी सम्राट, मराठा राण्या किंवा नवस्वतंत्र भारत यांना ही समाप्ती नाही; आम्ही पुन्हा उभारू हा एक जाणीवपूर्वक केलेला उच्चार होता.

सोमनाथ आपल्याला शिकवते की लवचिकता म्हणजे कधीही न पडणे नव्हे, तर पडूनही कायमचे न राहणे–पुन्हा पुन्हा उभे राहणे. समुद्रकिनारी उभे असलेले हे मंदिर केवळ भगवान शिवाचे स्मारक नाही; तर त्या अदम्य मानवी आत्म्याचे प्रतीक आहे, जो शतकानुशतके समुद्राच्या काठावर येऊन शांतपणे म्हणत राहतो–

आम्ही अजूनही येथे आहोत.
आम्ही स्मरण ठेवतो.
आम्ही पुन्हा उभारतो.
आम्ही टिकून राहतो.

# १० वी नंतर फार्मा क्षेत्रातील करिअरच्या अथांग संधी: वाढती लोकसंख्या आणि बदलत्या जागतिक चित्रात विद्यार्थ्यांसाठी उज्ज्वल भविष्य

नुकतेच महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने १० वी चे निकाल जाहीर केले आहेत. उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे आणि त्यांच्या पालकांचे मन:पूर्वक अभिनंदन! हा टप्पा पार केल्यानंतर आता प्रश्न पडतो, पुढे काय? पारंपरिक वाटा सोडून जर तुम्हाला विज्ञानाची ओढ असेल आणि भविष्यात शाश्वत करिअर करायचे असेल, तर 'फार्मा क्षेत्र' (Pharmaceutical Sector) हे तुमच्यासाठी एक सर्वोत्तम पर्याय आहे.

१. फार्मा क्षेत्राचे वाढते महत्त्व आणि बदल स्वरूप (Evolving Sector)

आजचे फार्मा क्षेत्र केवळ गोळ्या किंवा सिरप बनवण्यापुरते मर्यादित राहिलेले नाही.

वाढती लोकसंख्या आणि मागणी: वाढत्या लोकसंख्येमुळे आणि नवनवीन आजारांमुळे औषधांची मागणी दिवसेंदिवस वाढत आहे. औषधे ही अन्नासारखीच मानवाची मूलभूत गरज बनली आहेत, त्यामुळे या क्षेत्रात कधीही 'मंदी' येत नाही.

जागतिक केंद्र (Pharmacy of the World): भारत हा जगातील जेनेरिक औषधांचा सर्वात मोठा पुरवठादार आहे. जागतिक स्तरावर औषध निर्मितीत भारताचा तिसरा क्रमांक लागतो. याचाच अर्थ, या क्षेत्रात केवळ भारतातच नाही, तर परदेशातही नोकरीच्या प्रचंड संधी आहेत.

२. शैक्षणिक प्रवासाचा नकाशा (१० वी पासून सुरुवात)

१२ वी विज्ञान (Base Foundation): १० वी नंतर विद्यार्थ्यांनी विज्ञान शाखेत (Science) प्रवेश घ्यावा. भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र आणि जीवशास्त्र (झउइ) हे विषय तुमचे भवितव्य ठरवतात.

डी. फार्म (Diploma in Pharmacy): १२ वी नंतर २ वर्षांचा हा कोर्स आहे. हा ग्रामीण भागातील मुलांसाठी त्वरित रोजगाराचा उत्तम मार्ग आहे.

बी. फार्म (Bachelor of Pharmacy): हा ४ वर्षांचा पदवी अभ्यासक्रम आहे. औषध कंपन्यांमध्ये वरिष्ठ पदावर काम करण्यासाठी ही पदवी आवश्यक आहे.

एम. फार्म (Master of Pharmacy): २ वर्षांचे पदव्युत्तर शिक्षण. यामध्ये तुम्ही औषध निर्मिती (Pharmaceutics) किंवा औषध परिणाम (Pharmacology) यांसारख्या विषयांत तज्ज्ञ बनू शकता.

पीएच.डी. (PhD): ज्यांना संशोधनाची आवड आहे, ते डॉक्टरेट करून जागतिक दर्जाचे शास्त्रज्ञ बनू शकतात.

३. संधींचे अफाट आकाश (Opportunities)

उत्पादन आणि गुणवत्ता (Production QC): मोठ्या औषध कंपन्यांमध्ये औषध तयार करणे आणि त्याची गुणवत्ता तपासणे.

संशोधन आणि विकास (RD): नवीन आजारांवर नवीन औषधे शोधणे.

अकादमिक (-cademics): प्राध्यापक म्हणून नवीन पिढीला घडवणे.

सरकारी नोकऱ्या: आरोग्य विभाग, रेल्वे, सैन्य दलात 'फार्मासिस्ट' आणि 'ड्रग इन्स्पेक्टर' म्हणून सन्मानाची पदे.

उ द्या ` ज क ता (Entrepreneurship): स्वतःची फार्मसी (मेडिकल), औषध वितरण (Wholesale) किंवा लहान औषध निर्मिती युनिट सुरू करणे.

४. ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी विशेष आवाहन

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये निसर्गत: कष्टाची तयारी असते. आज औषध कंपन्यांना अशा कष्टाळू आणि प्रामाणिक तरुणांची गरज आहे. ग्रामीण भागातील आर्थिक परिस्थितीवर मात करण्यासाठी डी. फार्म सारखे कोर्सेस करून तुम्ही लवकर स्वतःच्या पायावर उभे राहू शकता. केवळ माहितीअभावी मागे राहू नका, जिद्द ठेवा!

५. यशाचा मंत्र: कठोर परिश्रम (Hard Work)

मित्रांनो, हे क्षेत्र बुद्धिमत्तेसोबतच कठोर परिश्रमाची (Hard Work) मागणी करते. औषध क्षेत्रात काम करताना लोकांच्या जीवाशी संबंध असतो, त्यामुळे येथे 'अचूकता' (Precision) महत्त्वाची आहे. यशासाठी कोणताही 'शॉर्टकट' नसतो. जो विद्यार्थी १० वी नंतरच्या या ५–६ वर्षांत झोकून देऊन अभ्यास करेल, त्याचे भविष्य अत्यंत सुरक्षित आणि वैभवशाली असेल.

तुमच्यातील जिद्द आणि कष्टाची तयारीच तुम्हाला यशाच्या शिखरावर नेईल. तुमच्या या प्रवासात माझ्या शुभेच्छा नेहमीच तुमच्या सोबत आहेत!

लेखक:
डॉ. हनुमंत गंभीरे
तज्ज्ञ, आर अँड डी (RD)
विभाग, नवी दिल्ली.
(अनुभवी फार्मा तज्ज्ञ व संशोधक)

# डिजिटल स्वाक्षरीयुक्त सातबारा उतारा आता घरबसल्या उपलब्ध

## नागरिकांनी एजंटांपासून सावध राहण्याचे लातूर जिल्हा प्रशासनाचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिकांना त्यांच्या जमिनीचे महसुली अभिलेख सुलभ, पारदर्शक आणि अत्यंत जलद गतीने उपलब्ध व्हावेत, यासाठी महसूल विभागातर्फे 'डिजिटल सातबारा' ही विशेष सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

अलीकडच्या काळात सातबारा उतारा मिळवण्यासाठी काही मध्यस्थ किंवा एजंट नागरिकांकडून अवाजवी पैसे उकळत असल्याच्या तक्रारी आणि बातम्या समोर येत आहेत. मात्र, नागरिकांना डिजिटल स्वाक्षरीयुक्त सातबारा उतारा प्राप्त करण्याची प्रक्रिया अत्यंत सोपी आणि माफक दरात उपलब्ध असून नागरिकांनी कोणत्याही एजंटांच्या प्रलोभनांना बळी पडू नये, असे आवाहन लातूर जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत करण्यात आले आहे.




भ ू म ी अभिलेख विभागाच्या https://bhulekh.mahabhumi.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर नागरिकांना स्वतःच्या जमिनीची माहिती पाहायची अथवा नोंदी तपासण्याची सुविधा पूर्णपणे विनामूल्य उपलब्ध आहे. या पोर्टलवर नागरिक आपला जिल्हा, तालुका आणि गाव निवडून सातबारा, आठ–अ आणि मालमत्ता पत्रक कोणत्याही शुल्काशिवाय पाहू शकतात, मात्र ही प्रत केवळ माहितीसाठी असून ती कायदेशीर कामासाठी वापरता येत नाही. कायदेशीर कामासाठी आवश्यक असलेला डिजिटल स्वाक्षरीयुक्त सातबारा उतारा मिळवण्यासाठी नागरिकांनी महसूल विभागाच्या https://digitalsatbara.mahabhumi.gov.in/dslr या संकेतस्थळाचा वापर करावा. या सुविधेसाठी शासनाने केवळ १५ रुपये इतके माफक शुल्क निश्चित केले आहे आणि विशेष म्हणजे उताऱ्याची पाने कितीही असली तरी हे शुल्क कायम राहते. या डिजिटल उताऱ्यास कोणत्याही सरकारी कार्यालयात, बँकेत किंवा न्यायालयीन कामकाजासाठी स्वतंत्र शिक्का किंवा तलाठ्यांच्या स्वाक्षरीची गरज लागत नाही, ज्यामुळे नागरिकांचा वेळ आणि श्रमाची मोठी बचत होत आहे.

डिजिटल उतारा प्राप्त करण्यासाठी नागरिकांनी प्रथम पोर्टलवर जाऊन 'न्यूज युझर रजिस्ट्रेशन' (New User Registration) द्वारे स्वतःची नोंदणी करून लॉगिन आयडी तयार करावा. त्यानंतर लॉगिन करून आपल्या जमिनीचा गट क्रमांक किंवा सर्व्हे नंबर प्रविष्ट करावा आणि यूपीआय (UPI), नेट बँकिंग किंवा डेबिट कार्डच्या माध्यमातून १५ रुपयांचा भरणा करावा. व्यवहार यशस्वी झाल्यानंतर डिजिटल स्वाक्षरीयुक्त उतारा पीडीएफ (PDF) स्वरूपात डाउनलोड करता येईल.

लातूर जिल्हा प्रशासनाने सर्व तलाठी आणि मंडळ अधिकाऱ्यांना नागरिकांना या प्रक्रियेत योग्य मार्गदर्शन करण्याच्या सूचना दिल्या आहेत. जर कोणत्याही व्यक्तीकडून या कामासाठी जादा पैसे मागितले जात असतील किंवा नागरिकांची फसवणूक होत असेल, तर त्यांनी तात्काळ लातूर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या ०२३८२–२२०२०० या दूरध्वनी क्रमांकावर तक्रार नोंदवावी, असे आवाहन जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत करण्यात आले आहे.

# प्रगल्भतेची गरज

सत्तेवर येताच विजय यांनी घरगुती वीजग्राहकांसाठी २०० युनिटपर्यंतचा वापर मोफत राहील, असा निर्णय घेतला. आधीच्या सरकारच्या कार्यकाळात राज्याचा विकासदर वाढला होता. आता कर्जाचे आकडे वाढू नयेत ही अपेक्षा!

तामिळनाडूची सूत्रे अभिनेता जोसेफ विजय, अर्थात 'थलपती' यांच्याकडे आली आहेत. द्रमुक आणि अण्णा द्रमुक यापैकी एक पक्ष आपापल्या मित्र पक्षांसह सत्तेवर येईल, असा अंदाज होता. तो धुळीला मिळवत विजय यांच्या नव्याने स्थापन झालेल्या 'तमिळगा वेत्री कळघम' (टीव्हीके) या पक्षाने पूर्ण समीकरणे बदलली. १०८ जागांसह हा पक्ष सर्वांत मोठा ठरला; मात्र बहुमतासाठी विजय यांना मोठीच धावपळ करावी लागली.



काँग्रेस, डावे पक्ष, इंडियन युनियन मुस्लिम लीग आणि व्हीसीके या पक्षांच्या पाठिंब्याने विजय यांचे सरकार सत्तेवर आले आहे. राज्यात टीव्हीके हाच सर्वांत मोठा पक्ष ठरलेला असताना आणि अन्य पक्षांकडे संख्याबळ नसताना टीव्हीकेचा सत्त-ास्थापनेचा दावा राज्यपालांनी विलंब न करता स्वीकारणे संकेताला धरून झाले असते; पण या घटनात्मक पदांवर विराजमान होणार्या व्यक्तींना घटनेच्या मर्यादांची फार फिकीर नाही. तामिळनाडूचे राज्यपाल राजेंद्र आर्लेकर यांनीही ते दाखवून दिले. अर्थात एनडीएच्या कार्यकाळात ते अनेक ठिकाणी दिसत असल्याने आर्लेकरांच्या कृतीबद्दल कोणाला आश्चर्य वाटले नाही. सत्ता स्थापन करणार्या पक्षाने विधानसभेत बहुमत सिद्ध करायचे, असे घटना सांगते, राज्यपालांसमोर नव्हे! बहुमत असल्याबद्दल राज्यपालांना विश्वास वाटला पाहिजे, हे म्हणणे बरोबर; पण सर्वांत मोठा ठरलेला एकच पक्ष सत्ता स्थापनेचा दावा करत असताना तर्क ताणायचा किती? अनेक कायदेतज्ज्ञांनी राज्यपालांच्या भूमिकेबद्दल नाराजी व्यक्त केली. ती स्वाभाविक होती. मतदारांनी विश्वास दाखविलेल्या पक्षाच्या प्रमुखाला राज्यपालांची चार वेळा भेट घ्यावी लागते, हे योग्य घडले नाही. द्रमुक आणि अण्णा द्रमुक एकत्र येऊन सरकार स्थापन करतील, अशी चर्चा देखील मधल्या काळात रंगली. त्यात तथ्य नव्हते. समान विचारधारा प्रमाण मानलेले हे दोन्ही पक्ष एकमेकांचे कट्टर शत्रू आहेत.

व्यावहारिक निर्णय

कोणत्याच पक्षाला स्पष्ट बहुमत नसताना सर्वाधिक संख्याबळ असलेल्या पक्षाने पाठिंबा मागितल्यास तो देणे, यात वावगे काय? काँग्रेसने राज्यातील स्थिती लक्षात घेऊन तो दिला. विशेष म्हणजे चटकन निर्णय घेण्याची काँग्रेसची ख्याती नसताना निर्णय वेळेत झाला. काँग्रेसने एम.के. स्टॅलिन यांच्या द्रमुकबरोबर आघाडी करून निवडणूक लढवली होती. द्रमुक हा काँग्रेसप्रणित 'इंडिया' आघाडीचा घटक आहे. अनेक वर्षांपासूनची आघाडी काँग्रेसने तोडल्याने द्रमुकने नाराज होणे स्वीकारता येण्यासारखे असले तरी सत्तास्थाप-नेची कोंडी फुटण्यास त्यातून मदत झाली. अन्यथा पुन्हा निवडणुका, हाच मार्ग होता! तो कोणालाच परवडणारा नव्हता. सत्त-ास्थापनेपासून रोखल्यास सामूहिक राजीनामा देऊ, असे विजय यांच्या पक्षाच्या आमदारांनी आधीच जाहीर केले होते. राजकारणात विजय नवखे आहेत, सत्तेमध्ये तर त्यांनी नुकतेच पाऊल ठेवले आहे. कृती आणि विधाने किती सावधगिरीने करावी लागतात, याचा अनुभव त्यांना लागलीच आला.

वारेमाप आश्वासने देत सत्तेवर यायचे आणि सत्तेत आल्यावर वेगवेगळ्या सबबी पुढे करायच्या, ही कसरत राजकीय नेत्यांच्या अंगवळणी पडली आहे. निवडणुकीत दिलेल्या आश्वासनांची आठवण करून देत एम.के. स्टॅलिन यांनी विजय यांना वचनपूर्ती करण्यास सांगितले. 'तुमच्या सरकारने केलेल्या दहा लाख कोटी रुपये कर्जाचा बोजा माझ्यावर आहे', असे अपुर्या माहितीवर आधारित उत्तर देऊन विजय अडचणीत आले. निवडणूक जिंकण्याचे कौशल्य त्यांनी सिद्ध केले आहे, आता सरकार चालविण्याचे कौशल्य त्यांना सिद्ध करावे लागेल. कोणालाच फेरनिवडणुका नको असल्याने विधानसभेच्या पटलावर बहुमत सिद्ध करणे विजय यांना अवघड जाणार नाही; पण त्यांच्या कामगिरीवर द्रमुक आणि अण्णा द्रमुक या पक्षांसह भाजप आणि केंद्र सरकारची नजर असेल. एम. जी. रामचंद्रन, जयललिता या चित्रपटसृष्टीतील कलाकारांनी तामिळनाडूच्या राजकारणावर ठसा उमटवला. चित्रपटप्रेमी तामिळ भाषकांनी विजय यांचा पर्याय निवडला आहे. त्यांचा विश्वास विजय सार्थ ठरविणार का, हे लवकरच दिसेल.

# चित्रशाला - अश्मयुगीन चित्रशालेचा अनमोल ठेवा

अमरावती येथील सहा हौशी निसर्ग संशोधकांनी महाराष्ट्र आणि मध्य प्रदेशाच्या सीमेवरील सातपुडा पर्वतात १५ ते २० हजार वर्षापूर्वीच्या तबल १८ अश्मयुगीन गुहचित्रांचा शोध लावला आहे. या संशोधन कार्याची भारत सरकारच्या पुरातत्व विभागाने विशेष दखल घेतली आहे. अमरावतीपासून सुमारे ८५ कि.मी अंतरावर , मोर्शी ते चांदूरबाजार चिखली सावंगीमार्गे धारूर गावाजवळून दिसणा-या सातपुडा पर्वतावर सर्वात उंचीवर असलेल्या मुंग्सादेव या १४३ फूट द २५ फूट रुंद आणि तेवढीच उंची असलेल्या गुहेत प्रचंड शिलेवर अश्मयुगीन चित्रे काढलेली आहेत .

डॉ. व्ही. टी. इंगोले, वन्यजीव लेखक प्र. सु. हिरुरकर, कुमार पाटील, ज्ञा.आ.दमाहे, पद्माकर लाड, डॉ. मनो-हर खोडे या ६ ज्येष्ठ पुरातत्व संशोधकांनी गुहाचित्रांचा शोध लावला. यात वाघ, हत्ती, जिराफ, गेंडा, रानगवे, सांबर, अस्वले, वानर, रानकुत्रे ह्यांची चित्रे आहेत. गिधाड या पक्षाचे एकमेव चित्र गेरुसारख्या लाल रंगात साकारले आहे. एवढेच नव्हे तर, एका गुहेत फांदीवर झोके घेणा-या आदिमानवाचे चित्रही काढलेले आहे. या मानवाचे पाय मात्र वानरांच्या पंज्यासारखे दाखवले आहेत. जवळपास ७०-८० फूट रुंद आणि ४० फूट उंचीच्या धनुष्यबाणा सारख्या अर्धगोलाकार शीलेवरील चित्रं हे वैशिष्टय आहे. हे तळापासून ४ फूट उंचीवर डावीकडून उजवीकडे विशिष्ट अंतरावर निर्माण केले आहे.

अभ्यासकांच्या मते, हिमयुगानंतर इंडोनेशियाच्या एका बेटावर ज्वालामुखी जागृत झाला. त्याची कोट्यावधी टन राख होऊन जगभर सर्वत्र पसरली. जगभरातील विविध प्राण्यांच्या जाती नष्ट झाल्या. दक्षिण अफ्रिकेतील कालहरी येथील बुशमन नावाचा आदिमानवाचा वंश मात्र वाचला. तो जगभर पस-रला. भारताचा विचार करता, १९५७ मध्ये पुराणवस्तू संशोधक डॉ. वाकणकर यांनी मध्य प्रदेशातील भोपालजवळील 'भीमबेटका' येथे ७८० गुहाचित्रे शोधली. अश्मायुगापासून ते पूर्वपाषण युगापर्यंतची ही चित्रे आहेत. पूर्वपाषाण मध्ये मुखत्वे प्राण्यांची चित्रे आहे. ही सर्व लाल रंगात आहेत. मुन्गासादेव येथे



सापडलेली सातपुडा पर्वतरांग भीमबेटकच्या अग्नेयाला आहे. याचा आकार ३० मीटर रुंद व १० मीटर उंच आहे. माणसाचा हात पोहचेल इतक्या उंचीवर ही चित्रे काढली आहेत प्रत्येक चित्राचा आकार १० ते १५ सेमी आहे.

अभ्यासकांच्या म्हणण्यानुसार भारतीय उपखंडातील मानवी जीवनाची सुरुवात विन्ध्य पर्वतातून झाली. हा मानव सुरुवातीला गुहेत रहात होता व नंतर आश्रयासाठी तो सातपुडा पर्वत रांगा येथे आला. आपण जगत असलेल्या जीवनशैलीचे टिपण त्याने चित्र भाषेत करून येणा-या पिढीला त्याबाबत अवगत केले आहे . मानवी अभिव्यक्तीचा हा सर्वात जुना ठेवा आहे. महाराष्ट्रसाठी हे सुवर्ण महोत्सवी वर्षात लाभलेले सोनेरी संचित आहे असे म्हणावे लागेल.

हजारो वर्षापूर्वी अशमयुगातील आदिमानव समूहाने पर्वतावरील गुहेत राहायचा. तो शिकार करून व कंदमुळे खाऊन जगायचा. धोकादायक प्राणी कोणता व उपयुक्त कोणता याचे ज्ञान समूहातील तरुणांना ह्यासाठी शिक्षण व संवादाचे साधन म्हणून या गुहाचित्रांचा वापर होत असावा असे तज्ञांचे मत आहे .भारतात अशा प्रकारचे गुहाचित्रे मध्य प्रदेशातील भीमबेटका येथे आहेत.भाजे लेणी-इहरक्षश ङशपळभाजे महाराष्ट्राच्या पुणे जिल्ह्यातील गाव आहे. हे गाव विसापूर किल्ल्याजवळ वसलेले असून याच्या आसपास लेणी आढळतात. भारत सरकारने या लेण्यांना दिनांक २६ मे इ.स. १९०९ रोजी महाराष्ट्रातील राष्टीय संरक्षित स्मारक म्हणून घोषित केलेले आहे. यात सुमारे बावीस लेणी आढळतात.

लेण्यांच्या मध्यभागी एक चैत्यगृह आहे. उर्वरित एकवीस विहार दोन्ही बाजूंना पसरलेले आहेत.

लेण्यांच्या मध्यभागी एक चैत्यगृह आहे. उर्वरित एकवीस दोन्ही बाजूना पसरलेले आहेत.

ही लेणी कलात्मकतेचा आविष्कार आहेत . येथे चैत्य गवाक्षांच्या माळा आहेत. त्यांना लागून कोरीव सज्जे बनवलेले आहेत. यातील काही सज्जांवर कोरीवकामातून जाळी आणि पडद्याचा भास निर्माण केलेला आहे. वेदिकापट्टी वासर नक्षीवर कोरीवकाम आहे. दगडात कोरून काढलेल्या कड्या आहेत. या ठिकाणी गवाक्षातून युगुले कोरेलेली दिसून येतात. तसेच येथे एक यक्षीणी कोरलेली आहे. या कमानीवर एकूण १७२ छिद्रे पाडलेली आहेत.

प्रवेशव्दार - चैत्यगृह १७.०८ मीटर लांब , ८.१३ मीटर रुंद आणि ७०३७ मीटर उंच असे आहे. त्यात सत्तावीस अष्टकोनी खांब आणि मधोमध स्तूप आहे. या खांबावर कमळ, चक्र अशी चिन्हेही कोरलेली आहेत. एका ठिकाणी एक खुंटी आणि तिला अडकवलेला फुलांचा हार कोरलेला आहे.चैत्यगृह - ईींवहळीीं क्शीळींरसशचैत्यगृहाला लाकडी तुळयांचे छत आहे. या तुळयांवर ब्राम्ही लिपीतील लेख आढळले आहेत. या चैत्यगृहाची निर्मिती इसवी सन पूर्व दुस-या शतकात भाजे लेणी कोरण्यास सुरुवात झाली असे मानले जाते. त्यानंतर आठशे वर्षे म्हणजेच इसवी सन सहाव्या शतकापर्यंत लेणी निर्मीतीची प्रक्रिया सुरु होती. येथील विहार दानातून उभे राहिलेले आहेत व त्यांच्याक दानाचे लेख तेथे दिसून येतात. चैत्यगृहाच्या दक्षिण दिशेस स्वच्छ पाण्याचा स्तोत्र आहे. भाजे लेणीचे दुमजली कोरीव काम केलेले आहे. येथील सूर्यलेणे प्रसिद्ध आहे. या लेण्यात पौराणिक प्रसंगाचे पट, सालंकृत-शस्त्रधारी द्वारपाल, वन्यप्राण्यांचे थर आणि चैत्य-स्तूपाचे नक्षीकाम कोरलेले आहे. यात सूर्य आणि इंद्राचा मानला जाणारा देखावा आहे. कोरीव कामाचा उत्कृष्ट नमुना असणारी ही लेणी महाराष्ट्राची शान आहेत

## उपदेशकथा: मनाची एकाग्रता



पांडुरंग ' मनाची एकाग्रता कशी करावी ' या विषयाचा अभ्यास करत बसला होता. त्याला जो कोणी भेटावयास येई, त्याच्याकडे तो दुर्लक्ष करायचा. आपल्याच चिंतनात मग्न असायचा. एकदा त्याचे गुरु सहदेव महाराज त्याच्याकडे आले. पाहतात तर पांडुरंग शून्यात नजर लावून बसलेला ! पांडुरंगाचे आपल्या गुरुकडे लक्षही नव्हते. सहदेव महाराज मात्र न रागावता तेथेच थांबले. त्यांनी एक वीट आणली आणि दिवसभर ती वीट एका दगडावर घासत बसले. शेवटी न राहवून पांडुरंगाने महाराजांना विचारले, '' महाराज आपण हे काय करता आहात ?'' सहदेव म्हणाले, '' मला या विटेचा आरसा बनवायचा आहे.'' पांडुरंग म्हणाला, '' महाराज, या विटेला घासून कधी आरसा होईल का ? जीवनभर घासत बसले तरीही विटेचा आरसा होणार नाही.'' ते ऐकून सहदेव हसले. म्हणाले, '' मग तू तरी काय करत आहेस ? वीट जर आरसा होत नसेल, तर मनाचे तरी काय ? मनावरील धूळ जोपर्यंत जात नाही, तोपर्यंत साधना करुन तरी काय उपयोग ?

## कर्करोग प्रतिबंधक उपाय

तंबाखू टाळा: धूम्रपान, सिगारेट किंवा कोणत्याही प्रकारची तंबाखू (गुटखा, मावा) खाणे टाळा. हे कर्करोगाचे मुख्य कारण आहे.संतुलित आहार: आहारात फळे, भाज्या, कडधान्ये आणि फायबरयुक्त पदार्थांचा समावेश करा. प्रक्रिया केलेले (ीलिशीशव) अन्न आणि जास्त चरबीयुक्त पदार्थ टाळा. निरोगी वजन: व्यायामाद्वारे शरीराचे वजन नियंत्रणात ठेवा. जास्त वजन अनेक प्रकारच्या कर्करोगाचा धोका वाढवू शकते.नियमित व्यायाम: दररोज किमान ३० मिनिटे वेगाने चालणे, धावणे किंवा योगासने करा. सूर्यप्रकाशापासून संरक्षण: कडक उन्हात जाणे टाळा, सनस्क्रीन वापरा आणि शरीर झाकणारे कपडे घाला, जेणेकरून त्वचेच्या कर्करोगाचा धोका कमी होईल.अल्कोहोलपासून दूर राहा: अल्कोहोलचे सेवन कमी करा किंवा अजिबात करू नका.

## १ Doctor Tips — सल्ला डॉक्टरचा

खरं कालांतराने ही समस्या गंभीर होऊन त्यामुळे वंधत्वाची तक्रार पुढे येऊ शकते. त्यामुळे अल्कोहोलपासून दूर राहणंच योग्य राहील असं म्हटलं जातं.




लैंगिक ताठरतेमध्ये निर्माण होणाऱ्या समस्या कसे रोखाल? संशोधनानुसार, लैंगिक ताठरतेच्या समस्या रोखण्यासाठी फ्लॅव्होनाईट्स सेवन करणं आवश्यक आहे. अभ्यासानुसार ब्ल्यूबेरीमध्ये आढळणारं अँन्थोसायनिन हे एक प्रकारचं फ्लॅव्होनाईड आहे.तसंच इतर लिंबूवर्गीय फळांमध्ये ते आढळून येतं. फळांच्या सेवनामुळे लैंगिक समस्येत १४ टक्क्यांपर्यंत सुधारणा होऊ शकते.

## २ Joke — विनोद




पिंटू शाळेतील पहिल्या दिवशी जाऊन घरी आला व आईला म्हणाला, ङ्गआई, बाईंनी विचारले की, तुला आणखी काही लहान भावंडे आहेत का?फ तेव्हा पिंटू म्हणाला की ङ्गनाहीतफ तेव्हा बाईंनी नि:श्वास सोडला व म्हणाल्या, देव पावला.फ

## ३ Message — संदेश




Kutton ka TV Serial
Agar Kutton ka TV pr 1 Channel ho to Socho Usme Serials ke Naam kuch Aise honge. .Yahan Me Gahr Gahr BHONKI .KAAT KHANA Sathiya .Agle Janam mohe KUTIYA hi kijo .Me KUTIYA Tere Aangan ki .Ye KUTTA kya Kehlata hai .Ek Hazaro me Meri Kutiya hai .Afsar Kutiya Is Kutte ko kya Naam dun Bade Kutte lgte hen..

## ४ Thought — सुविचार




निष्काम कर्म म्हणजे कर्मत्याग नव्हे.
- भगवद्गीता

**संस्कृत सुभाषित**

**अद्रोहं सर्वभूतेषु कर्मणा मनसा गिरा**
**अनुग्रहश्च दानं च शीलमेतत्प्रशस्यते ॥**
(शांतीपर्व, अध्याय १२४, श्लोक ६६, महाभारत)
अर्थ : कृतीने, मनाने आणि वाणीने कोणत्याही प्राण्यास त्रास न देणे, परोपकार करणे, दान करणे या प्रकाराचे शील प्रशस्त होय.

# मनोरंजक महाशब्दकोड्यांचा समाचार



### आडवे शब्द

१. अननुभवी
५. देवापाशी मागितलेला निर्णय
६. पवित्र
९. एक सुगंधी वनस्पती
१०. जंगलातील प्राणी
१२. वारा
१३. वाईट असल्यास आयुष्य नासवणारी
१४. नासाडी, नाश
१५. हात
१६. चटकन
१८. शपथ
१९. भाज्या घालून केलेला भात
२०. सरसकट
२२. खानदान, कूळ
२३. रमापती
२५. दारूचा प्रकार
२६. कपाळ
२७. कशा प्रकारचा?
२९. वर्ष
३१.गाडीचे छत
३३. सोन्याचा धागा
३४. सुंदर तरुणी
३५. डोळे
३६. असह्य वेदना
३८. लक्ष्मी
४२. पंचमहाभूतापैकी अग्नीचे रूप
४३. टप्प्या टप्प्याने केलेला प्रवास
४६. आकर्षक
४८. मूळ अर्थ धनुष्य, उद्धट, दांडगा (ला.)
४९. यापेक्षा फळे चिरून खाणे चांगले!
५०. च्या बरोबर
५१. क्षण (हिंदी)
५३. भंगार (हिंदी)
५५. अस्सल मातीतले
५६. खुंट, आंचळ
५७. घाबरट
५९. सुविधा
६०. हक्क सांगणारा, वैरी
६२. मध
६४. पांढुरका, कडक
६६. नासाडी, धूळधाण
६८. पत्र, टपाल
६९. गवताचे पान
७०. डोंगराचा सुळका, पोळीची किनार
७२. वाळवंटातून आलेला फुलांचा राजा
७४. स्तुती करणारा दरबारी
७५. स्वत:ला
७६. रघुपती बरोबर घेतली जाणारी रामाची आणखी दोन नावे
८०. दाक्षिणात्यांच्या जेवणातील हा पदार्थ इतका मुख्य की त्याला 'अन्न' असेच संबोधतात
८१. मृत्यू नसलेला
८२. पकडण्याचे साधन- मासा किंवा काहीही!
८३. चांदोबाची खेळण्याची जागा

### उभे शब्द

१. 'फारच मोठे प्रास्ताविक' याअर्थी प्रचलित म्हण
२. उत्तराधिकारी
३. रानरेडा
४. प्रतिष्ठा
५. गांधारीचे पुत्र
६. पोटाला चांगला नसलेला पोळीला पर्याय
७. अरण्य
८. यंदा पावसाळ्यात अशा पावसाचा अभावच होता
१०. वरपांगी
११. एवढी तरी हवीच अशी हालचाल
१२. घागरा
१३. समस्या, पेच
१५. विद्या
१७. सत्व
१८. दूध न देणारी गाय
१९. पुण्याचा रहिवासी
२१. घोडागाडी
२४. मत्स्य
२६. हिंदुस्तान
२८. चाणक्यनीती
३०. सोन्याचे नाणे
३२. उद्याच्या नंतरचा दिवस
३३. जय मिळवून देणारे
३७. विविध
३९. मस्ती, गर्व
४०. समय
४१. आजपर्यंत
४३अ. वजनाला भारी
४४. किंमत
४५. सैन्याचा दाणागोटा
४६. महात्मा गांधीजींचे नाव
४७. चषक
४८. फरशीनंतर असलेला लादीचा प्रकार
५०. सरळ मोठा वासा
५२. मनाची इच्छा
५३. टाळ्यांनी मिळालेली मोठी दाद
५४. विरोध, प्रतिबंध
५६. विषमच्या विरुद्ध
५८. भीती
६१. प्रमाणपत्र
६३. कधी रावाचा होतो, कधी याचा राव!
६५. पोस्ट ऑफीस (हिंदी)
६७. नट्टापट्टा
६९. पाचोळा
७१. खेळी
७३. पोशाखाची कळ
७४. नशीब, दैव
७५. अभिप्राय
७६. राघव
७७. संताप
७८. अग्नी, ज्वाळा
७९. अंत:करण

### आडवे उत्तरे

१.नवागत ५.कौल ६.पावन ९.मरवा १०.वनचर १२.पवन १३.संगत १४.नास १५.कर १६.लवकर १८.भाक १९.पुलाव २०.सकटनिकट २२.घराणे २३.रमावर २५.रम २६.भाल २७.कसा २९.साल ३१.टप ३३.जर ३४.रमणी ३५.नयन ३६.मरणयातना ३८.रमा ४२.तेज ४३.मजल दरमजल ४६.मोहक ४८.कोदंड ४९.रस ५०.सह ५१.पल ५३.कबाड ५५.गावरान ५६.सड ५७.भेदरट ५९.सोय ६०.दावेदार ६२.मकरंद ६४.करडा ६६.तसनस ६८.डाक ६९.पात ७०.कडा ७२.गुलाब ७४.भाट ७५.मला ७६.राघव राजाराम ८०.भात ८१.अमर ८२.गळ ८३.नभांगण

### उभे उत्तरे

१.नमनाला घडाभर तेल २.वारस ३.गवा ४.मान ५.कौरव ६.पाव ७.वन ८.संततधार १०.वरवर ११.चलनवलन १२.परकर १३.संकट १५.कला १७.कस १८.भाकड १९.पुणेकर २१.टमटम २४.मासा २६.भारत २८.साम दाम दंड भेद ३०.होन ३२.परवा ३३.जयावह ३७.नाना ३९.माज ४०.काल ४१.आजतागायत ४३अ. जड ४४.दर ४५.रसद ४६.मोहनदास ४७.कप ४८.कोबा ५०.सरा ५२.लहर ५३.कडकडाट ५४.हरकत ५६.सम ५८.डर ६१.दाखला ६३.रंक ६५.डाकघर ६७.नखरा ६९.पाला ७१.डाव ७३.बटण ७४.भाग्य ७५.मत ७६.राम ७७.राग ७८.जाळ ७९.मन



# क्रीडा विश्व

## थोडक्यात/ संक्षिप्त

### अक्षर पटेलला झाला एवढा मोठा दंड

मुंबई –अक्षर पटेलच्या नेतृत्वात दिल्ली कॅपिटल्सने दमदार सुरुवात केली होती, मात्र सलग पराभवांनंतर त्यांचे आव्हान संपुष्टात येण्याचा धोका निर्माण झाला होता. पण ११ मे रोजी झालेल्या पंजाब विरूद्धच्या सामन्यात दिल्लीने दमदार विजय मिळवला आणि आव्हान जीवंत ठेवले. मात्र बीसीसीआयने या सामन्यानंतर कर्णधार अक्षर पटेलवर दंड ठोठावला आहे.या सामन्यात अक्षर पटेलने गोलंदाजी केली नाही पण फलंदाजीत मोठे योगदान दिले. पंजाबने दिलेल्या २११ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना दिल्लीची सुरुवात खराब झाली. मात्र अक्षर पटेलने डेव्हिड मिल्लर सोबत उत्तम भागीदारी केली. त्याने ३० चेंडूंमध्ये ५६ धावांची अर्धशतकी खेळी केली.  दिल्लीने विजय मिळवला.पंजाब किंग्स विरूद्धच्या सामन्यात स्लो ओव्हररेट प्रकरणी नियमानुसार दिल्ली कॅपिटल्सच्या कॅप्टनला जबाबदार ठरवून बीसीसीआयने दंडात्मक कारवाई केली.

### वर्ल्ड कप खेळण्यासाठी दिग्गज खेळाडूंनी निवृत्ती

लंडन–टी–२० महिला वर्ल्ड कप २०२६ इंग्लंड आणि वेल्समध्ये खेळवला जाणार आहे. या स्पर्धे ची सुरुवात 12 जूनपासून होणार आहे. या स्पर्धे त सहभागी झालेल्या देशांनी आपापले प्रत्येकी १५ खेळाडूंचे संघ जाहीर केले आहेत. दक्षिण आफ्रिकेच्या संघाची नुकतीच झाली. या संघात एका अशा खेळाडूचा समावेश आहे जिनं काही दिवसांपूर्वीच निवृत्ती रद्द केल्याचे जाहीर केले होते. ही खेळाडू आहे शबनिम इस्माईल.शबनिम इस्म ाईलने आधी क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली होती. पण वर्ल्डकपच्या आधी तिनं निवृत्तीचा निर्णय रद्द करत पुन्हा खेळण्यासाठी सज्ज असल्याचे जाहीर केले होते. काही जवळच्या लोकांनी आणि दक्षिण आफ्रिका संघाचे मुख्य प्रशिक्षक मंडला माशिम्बी यांच्या प्रोत्साहनामुळेच हा निर्णय घेतल्याचे तिने सांगितले. देशासाठी खेळणे हा सन्मान आहे आणि संघात निवड झाल्यामुळे मला देशाचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळणार असल्याचे आणि त्यासाठी प्रचंड आनंद होत असल्याचे ती म्हणाली.

### बुमराह-सुदर्शन बाहेर... १५ जणांमध्ये कुणाला संधी!

मुंबई–आयपीएल २०२६ आता शेवटच्या टप्प्यावर येऊन पोहोचली आहे. आयपीएल संपल्यानंतर टीम इंडिया पुन्हा मैदानात उतरणार आहे. जून महिन्याम ध्ये टीम इंडिया एक टेस्ट मॅच आणि ३ वनडे मॅचची सीरिज खेळणार आहे. अफगाणिस्तानविरुद्धची एकमेव टेस्ट मॅच ६ जून आणि १० जून दरम्यान न्यू चंडीगढमधल्या मुल्लानपूर येथे होणार आहे. या टेस्ट मॅचनंतर दोन्ही टीममध्ये ३ वनडे मॅचची सीरिजही खेळवली जाईल.अफगाणिस्तानविरुद्धच्या टेस्ट सीरिजसाठी बीसीसीआय पूर्ण ताकदीची टीम मैदानात उतरवणार आहे. सुरूवातीला खेळाडूंचा वर्कलोड आणि वरिष्ठ खेळाडूंना विश्रांती देण्याबाबतची चर्चा सुरू होती, सर्व प्रमुख खे–ळाडू निवडीसाठी उपलब्ध असतील.शुभमन गिल याच्याकडेच भारताच्या टेस्ट आणि वनडे टीमचं नेतृत्व राहणार आहे. तसंच टेस्ट सीरिजमध्ये भार–ताची बॅटिंग ऑर्डरही तशीच राहण्याची शक्यता आहे.

### बांगलादेशने पाकला लोळवले, भारताचे समीकरण बिघडले

मुंबई–आयसीसी जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धात मोठा उलटफेर पाहायला मिळाला. बांगलादेशने पाकिस्तानविरुद्धच्या दोन सामन्यांच्या कसोटी मालिकेतील पहिला सामना जिंकत इतिहास रचला. मंगळवारी ढाक्यातील शेर–ए–बांगला राष्ट्रीय क्रिकेट स्टेडियम येथे झालेल्या या सामन्यात बांगलादेशने दमदार विजय मिळवला. वेगवान गोलंदाज नाहिद राणाने पाच विकेट घेत पाकिस्तानला अक्षरशः गुडघ्यावर आणले. या विजयामुळे डब्ल्यूटीसी गुणतालिकेतही मोठे बदल झाले असून भारतीय संघासाठी धोक्याची घंटा वाजू लागली आहे.सामन्यात प्रथम फलंदाजी करताना बांगलादेशने कर्णधार नजमुल हुसेन शांतोच्या शानदार शतकाच्या जोरावर ४१३ धावा केल्या. प्रत्युत्तरात पाकिस्तानकडून अझान अवैस याने शतक झळकावले, मात्र संपूर्ण संघ ३८६ धावांवर आटोपला.

## हैदराबाद फक्त ८६ धावांवर ऑलआऊट!

## गुणतालिकेत पहिलं स्थान गाठले

# गुजरातचा दणदणीत ऐतिहासिक विजय



नवी दिल्ली: गुजरात टायटन्सने सनरायझर्स हैदराबादच्या फलंदाजी फळीला सुरूंग लावत दणदणीत विजयाची नोंद केली आहे. गुजरातने हैदराबादचा धावांनी पराभव करत गुणतालिकेत पहिलं स्थान गाठलं आहे. यासह गुजरात टायटन्स संघाचे सर्वाधिक १६ गुण झाले आहेत, यासह त्यांचं प्लेऑफमधील स्थान जवळपास निश्चित झालं आहे. गुजरातच्या गोलंदाजीसमोर हैदराबादचा संघ फक्त ८७ धावांवर सर्वबाद झाला.

गुजरात टायटन्सने प्रथम फलंदाजी करत साई सुदर्शन व वॉशिंग्टन सुंदर यांच्या अर्धशतकांच्या बळावर १६८ धावांचं आव्हान दिलं. तर प्रत्युत्तरात हैदराबादचा कोणताच संघ २० धावांचा आकडाही पार करू शकला नाही, परिणामी संघ अवघ्या ८७ धावांवर सर्वबाद झाला. यामध्ये गुजरातच्या गोलंदाजांचं मोठं योगदान होतं.

'भारतीय संघात पुनरागमनाचा विचार नाहीये, अनेक वर्षांपूर्वीच मी'; भुवनेश्वर कुमारचं खळबळजनक वक्तव्य; भुवी असं का म्हणाला?गुजरात टायटन्सनने दिलेल्या १६९ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना पहिल्याच षटकात ट्रॅव्हिस हेड शून्यावर बाद झाला. तर कगिसो रबाडाच्या गोलंदाजीवर अभिषेक शर्मा, इशान किशन व स्मरण रविचंद्रन हे फलंदाज बाद झाले. त्यानंतर जेसन होल्डर व प्रसिध कृष्णा यांनी हैदराबादच्या उर्वरित संघाला माघारी धाडलं. कर्णधार पॅट कमिन्सने सर्वाधिक १९ धावांची खेळी केली. पण कोणताच फलंदाज २० धावांचा पल्ला पार करू शकला नाही. गुजरातकडून कगिसो रबाडा व जेसन होल्डर यांनी सर्वाधिक ३–३ विकेट्स घेतल्या. तर प्रसिध कृष्णाने २ व सिराज–रशीदने १–१ विकेट्स घेतल्या. मुंबई इंडियन्सने हार्दिक पंड्याला कर्णधारपदावरून काढून टाकलं? माहिका शर्माच्या इन्स्टा स्टोरीमुळे चर्चांना उधाण

हैदराबादने नाणेफेक जिंकत प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला. शुबमन गिल व जोस बटलरला अनुक्रमे ५ व ७ धावांवर प्रफुल्ल हिंगेने माघारी धाडलं. पण साई सुदर्शनने संघासाठी महत्त्वपूर्ण अर्धशतकी खेळी केली. साई सुदर्शन ४४ चेंडूत ५ चौकार व २ षटकारांसह ६१ धावा करत बाद झाला. तर निशांत सिंधूने १४ चेंडूत २२ धावांची झटपट खेळी केली. त्यानंतर वॉशिंग्टन सुंदरने ३३ चेंडूत ७ चौकार व एका षटकारासह ५० धावांची खेळी करत अर्धशतक झळकावलं.

## टीम डेव्हिडवर बीसीसीआयची कठोर करवाई, हंगामातून बॅन होण्याची शक्यता !



मुंबई–आयपीएल २०२६ मध्ये १० मे रोजी आरसीबी आणि मुंबईचा सामना झाला. या सामन्यात आरसीबीने अखेरच्या षटकात मुंबईचा २ विकेट्सने पराभव केला. पण आरसीबीचा स्फोटक फलंदाज टीम डेव्हिडवर बीसीसीआयने आचारसंहितेचा भंग केल्याप्रकरणी मोठी करवाई केली आहे. सामन्यादरम्यान मुंबईच्या खेळाडूंना अील हा–तवारे केल्याप्रकरणी त्याच्यावर बीसीसीआयने मॅच फी च्या ३० टक्के दंडासह दोन डिमेरिट पॉइंट्सची कारवाई केली आहे.

नेमके प्रकरण काय ?

आरसीबी आणि मुंबईमध्ये १० मे रोजी सामना संपल्यानंतर ही घटना घडली. सामना जिंकल्यानंतर टीम डेव्हिडने डगआउटमधून मिडल फिंगर दाखवली. या घटनेचा व्हिडीओ व्हायरल होत आहे. त्यानंतर आयपीएल प्रशासनाने त्याची गंभीर दखल घेत शिस्तभंगाची कारवाई केली आहे. या हंगामातील टीम डेव्हिडची हा दुसरी चूक आहे. यापूर्वी वानखेडेवर मुंबई विरुद्ध साम न्यात त्याने पंचांच्या सूचनांचे पालन न केल्याने त्याच्यावर एक डिमेरीट आणि ३० टक्के मॅच फी एवढा दंड आकारण्यात आला होता.

बॅन होण्याची शक्यता–या आयपीएलमध्ये टीम डेव्हिडच्या नावावर आता तीन डिमेरिट पॉइंट्स जमा झाले आ–हेत. नियमांनुसार बीसीसीआयने आयपीएल २०२५ पासून खेळाडू आणि अधिकाऱ्यांसाठी डिमेरिट पॉइंटसचे नियम कडक केले आ–हेत. हे डिमेरिट प.ॉइंट्स ३६ म हिन्यांपर्यंत राहतात. चार डिमेरिट पॉइंट्स झाल्यावर खेळाडूवर साम न्याची बंदी लावण्यात येते, तर त्यापेक्षा अधिक डिमेरिट पॉइंटस झाल्यास खेळाडूच्या निलंबनाचा कालावधीही वाढू शकतो. त्यामुळे पुढील दोन हंगामांतही टीम डेव्हिडकडून आणखी चूक झाल्यास त्याला मोठी शिक्षा होऊ शकते.

## पाकिस्तानला बांगलादेशने दिला दणका; मीरपूर कसोटीत शानदार विजय

दिल्ली–पाचही दिवस सातत्याने चांगला खेळ करत बांगलादेशने मीरपूर कसोटीत पाकिस्तानला नम वण्याची किमया केली. दोन वर्षापूर्वी बांगलादेशने पाकिस्तानला पाकिस्तानामध्ये हरवलं होतं. तशाच सातत्याने खेळ करत बांगलादेशने पाकिस्तानवर १०४ धावांनी दिमाखदार विजय मिळवला. या विजयासह बांगलादेशने दोन सामन्यांच्या मालिकेत १–० अशी आघाडी घेतली आहे.

पाकिस्तानने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला. कर्णधार नझमुल हसन शंटोचं शतक आणि मोमिनुल हकच्या ९१ धावांच्या खेळीच्या बळावर बांगलादेशने ४१३ धावांची मजल मारली. शंटोने १२ चौकार आणि २ षटकारांसह १०१ धावा केल्या. मोमिनुलने १० चौकारांसह ९१ धावा केल्या. अनुभवी मुशफकीर रहीमने ७१ धावा करत या दोघांना चांगली साथ दिली.

पाकिस्तानतर्फे मोहम्मद अब्बासने ५ विकेट्स पटकावल्या. शाहीन शहा आफ्रिदीने ३ विकेट्स घेत त्याला चांगली साथ दिली.प्रत्युत्तरादाखल खेळताना पदार्पणवीर अझान अवैसच्या शानदार शतकाच्या जोरावर पाकिस्तानने ३८६ धावा केल्या. अझानने १४ चौकारांसह १०३ धावांची खेळी साकारली. अब्दुल्ला फझल (६०), सलमान अघा (५८) आणि मोहम्मद रिझवान (५९) यांनी अर्धशतकी खेळी केल्या. बांगलादेशतर्फे मेहदी हसन मिराझने ५ विकेट्स पटकावल्या. बांगलादेशने २७ धावांची अल्प आघाडी घेतली.

बांगलादेशने दुसऱ्या डावात २४० धावांवर डाव घोषित केला. कर्णधार शंटोने ७ चौकारांसह ८७ धावांची खेळी केली. मोमिनुल हकने ५६ धावा करत त्याला चांगली साथ दिली. चौथ्या दिवसाचा बराच वेळ पावसामुळे वाया गेला. त्यामुळे बांगलादेशने पाचव्या दिवशीही डाव सुरूच ठेवला. अडीच सत्र बाकी असताना बांगलादेशने पाकिस्तानला २६८ धावांचं लक्ष्य दिलं.

पाचव्या दिवशी आव्हानात्मक खेळपट्टीवर पाकिस्तानच्या फलंदाजांची भंबेरी उडाली. अब्दुल्ला फझलने ६६ धावांची एकाकी झुंज दिली. कर्णधार शान मसूद २ करून तंबूत परतला. अनुभवी सलमान अघा आणि सौद शकील मोठी खेळी करू शकले नाहीत. बांगलादेशतर्फे वेगवान गोलंदाज नाहिद राणाने भेदक मारा करत ५ विकेट्स पटकावल्या. तास्किन अहमद आणि ताजिअुल इस्लाम यांनी प्रत्येकी २ विकेट्स घेत नाहिदला चांगली साथ दिली. पाकिस्तानचा दुसरा डाव ५२.५ षटकात १६३ धावांतच आटोपला.

## ६.५ फुटी बॉलरने आग ओकली, बांगलादेशचा पाकवर विजय!

मुंबई–बांगलादेशने पहिल्या टेस्ट मॅचमध्ये पाकिस्तानचा १०४ रननी पराभव केला आहे. ढाक्यामध्ये झालेल्या या सामन्यात पाकिस्तानला चौथ्या इनिंगमध्ये २६८ रनचे आव्हान मिळाले होते, या आव्हानाचा पाठलाग करताना पाकिस्तानची टीम १६३ रनवर ऑलआऊट झाली, त्यामुळे त्यांचा १०४ रननी लाजिरवाणा पराभव झाला. चौथ्या इनिंगमध्ये बांगलादेशचा साडेसहा फुटी फास्ट बॉलर नाहिद राणाने कहर केला, त्याने पाकिस्तानच्या ५ विकेट घेतल्या. बांगलादेशचा त्यांच्या घरच्या मैदानात पाकिस्तानविरुद्धचा हा पहिलाच विजय आहे.

टेस्ट क्रिकेटमध्ये बांगलादेशचा पाकिस्तानविरुद्धचा हा लागोपाठ तिसरा विजय आहे. इतिहासात पहिल्यांदाच बांगलादेशने पाकिस्तानला लागोपाठ ३ टेस्ट मॅचमध्ये पराभूत केलं आहे. बांगलादेशच्या या विजयाची मालिका ऑगस्ट २०२४ पासून सुरू झाली आहे.

चौथ्या इनिंगमध्ये पाकिस्तानला विजयासाठी २६८ रनचं आव्हान मिळालं होतं. तस्कीन अहमदने पहिल्याच ओव्हरमध्ये इमाम उल हकला आऊट केलं. पहिल्या इनिंगमध्ये शतक करणाऱ्या अजान अवैसची बॅट या इनिंगमध्ये शांत राहिली. फक्त १५ रन करून तो आऊट झाला. ६८ रनवरच पाकिस्तानच्या ३ विकेट गेल्या होत्या, तेव्हा त्यांना विजयासाठी आणखी २०० रनची गरज होती. सलमान आगा आणि अब्दुल्ला फजल यांच्यात ५१ रनची पार्टनरशीप झाली.

## हार्दिक, रोहित, सूर्या नाही, तर... कोण होणार मुंबईचा पुढचा कॅप्टन? मांजरेकरांनी नावच सांगितले!

मुंबई–पाचवेळची आयपीएल चॅम्पियन मुंबई इंडियन्स आयपीएल २०२६ मधून बाहेर झाली आहे. या मोसमात मुंबईने केकेआरविरुद्ध विजय मिळवून धमाकेदार सुरूवात केली होती, पण या मोसमात मुंबईला फक्त ३ मॅचच जिंकता आल्या आहेत. रविवारी आरसीबीविरुद्धच्या सामन्यात शेवटच्या बॉलवर पराभव झाल्यानंतर मुंबई प्ले–ऑफच्या रेसमधून बाहेर झाली. यानंतर हार्दिक पांड्याच्या कॅप्टन्सीवर एक्सपर्ट्स आणि चाहते जोरदार टीका करत आहेत.

मुंबईने या मोसमात ११ सामन्यांमध्ये फक्त ३ विजय मिळवले आहेत. लखनऊनंतर प्ले–ऑफच्या रेसमधून बाहेर झालेली दुसरी टीम आहे. हार्दिक पांड्याची कॅप्टन्सी तसंच त्याची बॅटिंग आणि बॉलिंगही मुंबईच्या खराब कामगिरीचं एक प्रमुख कारण ठरली. आयपीएल २०२३ नंतर हार्दिक पांड्याला आयपीएलमध्ये एकही अर्धशतक ठोकता आलेलं नाही.

आयपीएल २०२४ मध्ये हार्दिक पांड्या गुजरात टायटन्समधून मुंबईच्या टीममध्ये आला आणि त्याला कर्णधारही करण्यात आलं, पण पहिल्याच मोसमात मुंबई टेबलमध्ये शेवटच्या क्रमांकावर राहिली तर आयपीएल २०२५ मध्ये मुंबई प्ले–ऑफपर्यंत पोहोचली. आता या मोसमातही मुंबई संघर्ष करत आहे, त्यामुळे हार्दिकला कॅप्टन्सीवरून काढण्याची मागणी केली जात आहे.

मुंबई इंडियन्सने हार्दिक पांड्याला कॅप्टन्सीवरून हटवून बुमराहला कॅप्टन करावं, अशी मागणी संजय मांजरेकर यांनी केली आहे. टीमने नेतृत्वाबाबत पुनर्विचार करून स्टार फास्ट बॉलर बुमराहला टीमची कॅप्टन्सी देण्याची गरज आहे, असे संजय मांजरेकर म्हणाले आहेत.'मला बुमराहला भारतीय टीमचा कॅप्टन म्हणून पाहायचे आहे, कारण कुणालाही त्याचाइतका चांगला खेळ कळतो, असे मला वाटत नाही. त्याच्या बॉलिंगमध्ये फक्त ॲक्शनच नाही, तर पुर्वानुमान, बॅटरचा अभ्यास करणे, परिस्थिती समजून घेणे आणि पिचची माहिती करून घेणे हे सगळे आहे. इंग्लंडमध्ये तो कॅप्टन्सीला तयार झाला नाही, त्यामुळे मी निराश झालो. गिलला कॅप्टन बनवले गेले, पण आयपीएलमध्ये त्याने कॅप्टन व्हावे, त्याला ही संधी नक्की मिळेल', असे वक्तव्य संजय मांजरेकर म्हणाले आहेत.

पांड्या–नेहराचं पॅकेज डील?

मुंबईने जेव्हा हार्दिक पांड्याला टीममध्ये आणलं तेव्हा त्यांनी आशिष नेहरालाही टीममध्ये आणलं पाहिजे होतं. हार्दिक आणि नेहरा एक यशस्वी पार्टनरशीप म्हणून समोर आली. गुजरात टायटन्सना या दोघांमुळे आयपीएल ट्रॉफी जिंकता आली, असंही संजय मांजरेकर म्हणाले.'मुंबईला हार्दिक पांड्याचा पर्याय शोधावा लागेल, कारण त्याला टीममध्ये आणण्याचा निर्णय योग्य ठरला नाही. हार्दिकसोबतही अन्याय झाला आहे. हे एकप्रकारचे पॅकेज डील आहे. जर हार्दिकला मुंबईमध्ये यायचे होते, तर त्यांनी नेहरालाही सोबत आणायला पाहिजे होते,' अशी प्रतिक्रिया संजय मांजरेकर यांनी दिली आहे.

# मॅडम मोठा गोंधळ घालून गेल्यात: बृजभूषण सिंह यांचं विनेश फोगाटबाबत मोठं वक्तव्य

नवी दिल्ली:मध्ये विनेश फोगाटसह सहा महिला कुस्तीपटूंनी लैंगिक छळाचा आरोप केलेल्या बृजभूषण सिंग यांनी विनेशच्या सध्याच्या प्रकरणावर वक्तव्य केलं आहे.

भारतीय कुस्ती महासंघाचे माजी अध्यक्ष बृजभूषण शरण सिंह यांनी मंगळवारी कुस्तीपटू विनेश फोगाटच्या विधानांवर प्रतिक्रिया दिली. विनेशने सोमवारी आरोप केला होता की भारतीय कुस्ती महासंघाकडून तिला महिला फ्रीस्टाईल प्रकारात स्पर्धा खेळण्याची परवानगी देण्यात आली नाही. २०२३ मध्ये विनेशसह सहा महिला कुस्तीपटूंनी बृजभूषण शरण सिंह यांच्यावर लैंगिक छळाचे आरोप केले होते. मात्र, या संपूर्ण वादावर प्रतिक्रिया देताना बृजभूषण म्हणाले की, ङ्गसोमवारी विनेशने मांडलेला विषय आता माझ्याशी संबंधित नाही.ङ्घ

ङ्गमॅडमने जो गोंधळ घालून गेल्या आहेत, तो सध्या मी साफ करत आहे. तसेच, कुस्तीची स्पर्धा कुठे होणार किंवा होणार नाही, हा विषय आता माझ्या अधिकारक्षेत्रात येत नाही. हा निर्णय पूर्णपणे सध्याच्या भारतीय कुस्ती महासंघाचा आहे. स्पर्धा कुठे आयोजित करायची, कोण खेळणार आणि कोण नाही, हे ठरवण्याचा अधिकार त्यांच्याकडे आहे,ङ्घ असं बृजभूषण शरण सिंह यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितलं.पुढे म्हणाले, ङ्गमी अनेक वर्षे महासंघाचा अध्यक्ष होतो. त्या अनुभवावरून एवढंच सांगू शकतो की महासंघ कधीही कोणत्याही खेळाडूला विनाकारण खेळण्यापासून रोखत नाही, कारण महासंघ हा खेळाडूंसाठीच असतो. जर एखाद्या खेळाडूला थांबवण्यात आलं असेल, तर त्यामागे काही कारण नक्कीच असेल आणि ते कारण संबंधित खेळाडूला सांगितलंही गेलं असेल.ङ्घ

दरम्यान, भारतीय कुस्ती महासंघाने विनेश फोगाटला



डोपिंगविरोधी नियमांचं उल्लंघन आणि शिस्तभंगाचे आरोप करत कारणे दाखवा नोटीस बजावली होती. तसेच तिला २६ जूनपर्यंत स्पर्धांमधून बंदी घालण्यात आली आहे. या नोटिसनंतर अवघ्या दोन दिवसांनी विनेश गोंडा येथे आयोजित राष्ट्रीय ओपन रँकिंग स्पर्धे साठी पोहोचली. विशेष म्हणजे, एप्रिलच्या अखे–रीसच तिने या स्पर्धेसाठी नोंदणी केली होती.

ङ्गबृजभूषण यांनी छळ केलेल्या त्या सहा पीडितांपैकी मी एकःङ्घ, विनेश फोगाटचा धक्कादायक खुलासा; म्हणाली, ङ्गएका महिलेसाठी अशा स्थितीतः पॅरिस ऑलिम्पिकमधील निराशेनंतर तब्बल दोन वर्षांनी पुनरागमन करण्याच्या तयारीत असलेल्या विनेश फोगाटला भारतीय कुस्ती महासंघाकडून सविस्तर कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. महासंघाने तिच्यावर शिस्तभंग आणि डोपिंगविरोधी नियमांचे उल्लंघन केल्याचे आरोप केले असून, २६ जूनपर्यंत देशांतर्गत स्पर्धांमध्ये सहभागी होण्यास अपात्र ठरवलं आहे. महिला फ्रीस्टाईल प्रकारासाठी पडताळणी प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी विनेश गोंडा येथे पोहोचली होती.

मात्र, महासंघाने तिला आधी शनिवारी पाठवलेल्या नोटिसला सविस्तर उत्तर देण्यास सांगितलं.भारतीय कुस्ती महासंघाच्या मते, निवृत्तीनंतर पुनरागमन करणाऱ्या खेळाडूंना यूडब्ल्यूडब्ल्यूच्या डोपिंगविरोधी नियमांनुसार अनिवार्य सहा महिन्यांची नोटीस कालावधी पूर्ण करावा लागतो. ३१ वर्षीय विनेशने ही प्रक्रिया पूर्ण केली नसल्याचा दावा महासंघाने केला आहे. संतापलेला कर्णधार नेमकं काय म्हणाला?भारतीय कुस्ती महासंघाचे अध्यक्ष संजय सिंह यांनी 'द इंडियन एक्स्प्रेस'शी बोलताना स्पष्ट केलं की, खेळाडू कितीही मोठा असला तरी नियम ांमध्ये सवलत दिली जाऊ शकत नाही. ङ्गविनेशला स्पर्धेत सहभागी होण्यास बंदी असल्यामुळे तिने येथे येण्याचं काही कारण नव्हतं. मात्र, ती गोंडाला आल्यानंतर महासंघाने तिला कारणे दाखवा नोटीस का बजावण्यात आली, याची सविस्तर माहिती दिली. त्यावर तिने मला सांगितलं की ती याबाबत सविस्तर उत्तर देणार आहे,ङ्घ असं संजय सिंह म्हणाले.

# शिवहर आकुसकर यांचा सेवागौरव व निरोप समारंभ उत्साहात




**रेणापूर / प्रतिनिधी :** येथील पंचायत समिती शिक्षण विभाग, जिल्हा परिषद शिक्षक व कर्मचारी पतसंस्था तसेच जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळा दर्जीबोरगाव यांच्या संयुक्त विद्यमाने सेवानिवृत्त शिक्षक शिवहर आकुसकर यांचा सेवागौरव व निरोप समारंभ जिल्हा परिषद केंद्रीय शाळा, दर्जीबोरगाव येथे उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिक्षण विस्तार अधिकारी संजय देशपांडे हे होते. मुख्याध्यापक व्यंकटराव गित्ते म्हणाले की ज्या शाळांमध्ये प्रशासनिक अथवा शैक्षणिक अडचणी निर्माण होत असत, त्या ठिकाणी काही काळासाठी आकुसकर सरांची नियुक्ती करण्यात येत असे. अशा प्रत्येक ठिकाणी त्यांनी अत्यंत तळमळीने व समर्पित भावनेने काम केले. शासनाने सोपविलेल्या कोणत्याही कामास त्यांनी कधीही नकार दिला नाही.

ते पुढे म्हणाले की, जि. प. शाळा पारुनगर, मुरूड येथे त्यांनी एक वर्ष कार्य करत शिक्षकांना प्रेरणा दिली. तसेच आरजखेडा (ता. रेणापूर) येथे शिक्षकांची कमतरता असल्याने दोन वर्षे कार्यरत राहून विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची जबाबदारी समर्थपणे सांभाळली. आपल्या सेवाकाळात त्यांनी शैक्षणिक कार्यासोबतच सामाजिक उपक्रमांतही उल्लेखनीय योगदान दिले.

रेणापूर येथे जिल्हा परिषद शाळेची इमारत गावात व्हावी यासाठी त्यांनी सातत्याने पाठपुरावा केला. शासनाकडून निधीही मंजूर करून आणला होता; मात्र जागेअभावी तो निधी परत जावा लागला, अशी खंत आकुसकर सरांना अजुनही वाटते .

स्वच्छता अभियान, वृक्षारोपण, चावडी वाचन, शाळाबाह्य वर्ग, जनगणना, स्वातंत्र्यसैनिकांच्या कुटुंबीयांचा सत्कार, मतदार जनजागृती अभियान, गुणवत्ता अभियान, पल्स पोलिओ यांसारख्या विविध उपक्रमांमध्ये आकुसकर सरांनी घेतलेली मेहनत व तळमळ उल्लेखनीय असल्याचेही त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून गणेश मेनगुळे, केंद्रप्रमुख तथा चेअरमन गोपाळ पडीले, केंद्रीय मुख्याध्यापक परमेश्वर बालकुंदे यांची उपस्थिती होती. तसेच केंद्रातील सर्व शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी व्यंकट गीते, बालाजी नागरगोजे, गणेश मेनगुळे, संजय देशपांडे, परमेश्वर बालकुंदे आदी मान्यवरांनी आकुसकर यांच्या कार्याचा गौरवपूर्ण उल्लेख केला. उपस्थित मान्यवर व ग्रामस्थांच्या हस्ते त्यांचा व आकुसकर परिवारांचा शाल श्रीफळ पुष्पहार घालून सपत्नीक सत्कार करण्यात आला. पंचायत समिती रेणापूर शिक्षण विभागाच्या वतीने शाल, पुष्पहार, श्रीफळ व भेटवस्तू देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. जिल्हा परिषद शिक्षक पतसंस्थेच्या वतीने पूर्ण आहेर देण्यात आला. तसेच केंद्रीय शाळेच्या वतीने आकुसकर यांना कपडे, तर त्यांच्या पत्नी व आई यांना साडी देऊन सन्मानित करण्यात आले.

सत्काराला उत्तर देताना शिवहर आकुसकर यांनी आपल्या ३८ वर्षांच्या सेवाकाळातील अनुभव कथन केले. ते म्हणाले की, जि. प. शाळा आरजखेडा (ता. रेणापूर) तसेच जि. प. शाळा पारुनगर, मुरूड (ता. लातूर) येथे शिक्षकांची कमतरता असल्यामुळे माझी नियुक्ती करण्यात आली होती. शासनाने ज्या ठिकाणी गरज भासली त्या त्या ठिकाणी मला पाठविले आणि अपेक्षित कार्य माझ्याकडून पूर्ण झाले. या कार्यात मला सर्वांचे मोलाचे सहकार्य लाभले.

ते पुढे म्हणाले की, रेणापूर येथे नवीन जिल्हा परिषद शाळा सुरू करून त्या ठिकाणी शासनाने माझी मुख्याध्यापक म्हणून नियुक्ती केली. शाळेच्या इमारत बांधकामासाठी निधीही माझ्या खात्यावर जमा करण्यात आला होता. मात्र जागेअभावी त्या ठिकाणी नवीन शाळेची इमारत उभी करता आली नाही, याची खंत आजही मनात आहे. माझ्या शैक्षणिक व सामाजिक कार्याची दखल घेऊन सांस्कृतिक स्त्रोत व प्रशिक्षण केंद्र, नवी दिल्ली यांच्या वतीने मला पुरस्कार प्रदान करण्यात आला. तसेच तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद लातूर मा. प्रवीण गेडाम यांनी प्रशस्तीपत्र देऊन वेतनवाढीचा विशेष लाभ दिला, असेही त्यांनी सांगितले.

माझ्या सेवाकाळात लातूर जिल्हा परिषदेतील सर्व शिक्षणाधिकारी यांनी वेळोवेळी माझ्या कार्याचे कौतुक केले, प्रशस्तीपत्रे दिली. विविध समाजघटकांनीही माझ्या कामाची दखल घेतली. त्यामुळे मला सतत प्रेरणा व कार्याची ऊर्जा मिळत राहिली. आज ३८ वर्षांची सेवा पूर्ण करून मी आनंदाने आणि समाधानाने निरोप घेत आहे, असे भावनिक उद्गार त्यांनी काढले.

कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन केंद्रीय मुख्याध्यापक परमेश्वर बालकुंदे यांनी केले.

## खरीप हंगाम २०२६-२७ करिता बियाणे वितरण आणि पीक प्रात्यक्षिकांसाठी ऑनलाईन अर्ज प्रक्रिया सुरु

**लातूर/प्रतिनिधी :** सन २०२६-२७ च्या खरीप हंगामासाठी राष्ट्रीय खाद्यतेल अभियान (तेलबिया), राष्ट्रीय अन्न सुरक्षा व पोषण अभियान, तसेच कडधान्य आत्मनिर्भरता अभियानांतर्गत विविध उपक्रम राबविले जात आहेत. या अभियानांतर्गत प्रमाणित बियाणे वितरण आणि पीक प्रात्यक्षिकांसाठी महाडीबीटी प्रणालीवर ऑनलाईन अर्ज करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे.

गळीतधान्य, अन्नधान्य, तृणधान्य, भरडधान्य आणि कडधान्य पिकांचे क्षेत्र व उत्पादन वाढवणे हे या अभियानाचे मुख्य उद्दिष्ट आहे. शेतकऱ्यांना सुधारित वाणांचे दर्जेदार बियाणे वेळेवर उपलब्ध करून देण्यासाठी शासन स्तरावर ही पावले उचलली जात आहेत. खरीप हंगामातील तूर, मूग, उडीद, मका, ज्वारी आणि सोयाबीन यांसारख्या प्रमुख पिकांसाठी १० वर्षांखालील आणि १० वर्षांवरील वाणांचे बियाणे वितरित केले जाणार आहे. यासोबतच पीक प्रात्यक्षिकांसाठी देखील शेतकऱ्यांना ऑनलाईन अर्ज करता येणार आहे.

कडधान्य आत्मनिर्भरता अभियानांतर्गत प्रमाणित बियाणे संच (मिनीकीट) वितरणाची प्रक्रिया 'प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य' या तत्त्वावर राबविली जाणार आहे. यासाठी १० एप्रिल २०२६ पासून महाडीबीटी पोर्टलवर अर्जाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. पात्र शेतकऱ्यांनी महाडीबीटी पोर्टलवर जाऊन तातडीने आपले ऑनलाइन अर्ज सादर करावेत, जेणेकरून त्यांना या योजनांचा वेळेत लाभ घेता येईल. शेतकऱ्यांनी अधिक माहितीसाठी आपल्या संबंधित तालुका कृषी कार्यालयाशी संपर्क साधावा किंवा महाडीबीटी पोर्टलला भेट द्यावी, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राजेंद्र कदम यांनी केले आहे.

## लातूर येथे १५ मे रोजी पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा

### बँकिंग व फायनान्स क्षेत्रात नोकरीची मोठी संधी

**लातूर/प्रतिनिधी :** जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योगकता मार्गदर्शन केंद्र आणि मॉडेल करिअर सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार, १५ मे २०२६ रोजी सकाळी १० वाजता एका भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. बँकिंग, फायनान्स आणि इन्शुरन्स क्षेत्रात करिअर करू इच्छिणाऱ्या तरुणांसाठी आयोजित हा मेळावा लातूर जिल्हा कौशल्य विकास केंद्राच्या येथे होणार आहे.

या मेळाव्यामध्ये क्रेडिट क्सेस ग्रामीण लि. (लातूर), श्रीराम फायनान्स लिमिटेड (लातूर), नीट लि. (पुणे) आणि पेटीएम (लातूर) यांसारख्या नामवंत आस्थापना सहभागी होणार असून त्या पुणे व लातूर येथील रिक्त पदांसाठी प्रत्यक्ष मुलाखती घेणार आहेत. या भरती प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी १० वी, १२ वी उत्तीर्ण तसेच कोणत्याही शाखेचे पदवीधर किंवा पदव्युत्तर पदवी शिक्षण पूर्ण केलेले उमेदवार पात्र ठरणार आहेत. याव्यतिरिक्त, तरुणांना शासनाच्या विविध योजनांची माहिती मिळावी यासाठी मेळाव्यात 'प्रधानमंत्री इंटर्नशिप योजना' चा स्वतंत्र स्टॉल देखील उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

इच्छुक उमेदवारांनी १५ मे रोजी सकाळी १० वाजता स्वखर्चाने या मेळाव्याला उपस्थित राहावे. येताना शैक्षणिक कागदपत्रे, स्वतःचा रिझ्युम, बायोडाटा आणि पासपोर्ट आकाराचे फोटो यांच्या किमान तीन प्रती सोबत आणणे आवश्यक आहे. जास्तीत जास्त उमेदवारांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त नि. ना. सूर्यवंशी यांनी केले आहे.

## कंकाळ महिलांनी १००% गुण मिळावलेल्या स्वरित व मंजिली चा सत्कार केला



**लातूर/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्या माध्यमीक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे जाहीर झालेल्या दहावीच्या परीक्षेत २०२६ मध्ये १०० पैकी १०० टक्के गुण मिळवून अभूतपूर्व यश मिळवत इतिहास घडवलेल्या स्वरीत व बाळू चोपडे यांची कन्या मंजिली चोपडे ने विना क्लासेस ८१% गुण घेतल्याने कंकाळ महिलांनी दोघांनचे पण औक्षण करून शाल फेटा व पेढा खाऊ घालून सत्कार करून पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या या प्रसंगी दोन्ही परिवारातील सर्व महिला सदस्य उपस्थित होते.

## लातूर जिल्ह्यातील १० टपाल कार्यालयांमध्ये आधार सेवा उपलब्ध

### नागरिकांनी लाभ घेण्याचे टपाल विभागाचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी :** भारतीय टपाल विभागाच्या लातूर विभागामार्फत जिल्ह्यातील नागरिकांच्या सोयीसाठी आधार सेवांचे विस्तारीकरण करण्यात आले आहे. आता लातूर जिल्ह्यातील प्रमुख १० टपाल कार्यालयांमध्ये नवीन आधार नोंदणी आणि आधार दुरुस्तीची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली असून, नागरिकांनी या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन टपाल विभागामार्फत करण्यात आले आहे.

**टपाल विभागाच्या या कार्यालयांमध्ये मिळणार सुविधा**

लातूर विभागातील अहमदपूर (भ्रमणध्वनी क्र. ७३८७१००४०८), औराद शहाजनी (भ्रमणध्वनी क्र. ९१४५६०१६५२), औसा (भ्रमणध्वनी क्र. ७७५८०७५६११), लातूर जुने रेल्वे स्टेशन (भ्रमणध्वनी क्र. ९३०७३८५११३), चाकूर (भ्रमणध्वनी क्र. ७७४५०११५४७), किल्लारी (भ्रमणध्वनी क्र. ७०५७६००८५०), गांधी चौक लातूर मुख्य टपाल कार्यालय (भ्रमणध्वनी क्र. ७७०९७९७५९६), मुरूड (भ्रमणध्वनी क्र. ७०८३३६५००६), निलंगा (भ्रमणध्वनी क्र. ८७९३७२४९०४) आणि उदगीर (भ्रमणध्वनी क्र. ७७६७८४८६२४) या टपाल कार्यालयांमध्ये आधार केंद्र कार्यान्वित करण्यात आले आहेत. संबंधित केंद्रांच्या नावापुढे दिलेल्या संपर्क क्रमांकावर नागरिक अधिक माहितीसाठी संपर्क साधू शकतात.

या केंद्रांच्या माध्यमातून नागरिकांना नवीन आधार नोंदणी करणे, आधार कार्डावरील मोबाईल क्रमांक अद्ययावत करणे, पत्ता बदलणे तसेच बायोमेट्रिक माहिती (ठसे व डोळ्यांचे स्कॅनिंग) अद्ययावत करणे यांसारख्या महत्त्वपूर्ण सेवा प्रदान केल्या जाणार आहेत. विशेषतः ज्या नागरिकांचे आधार जुने झाले आहे किंवा ज्यांना कागदपत्रे अद्ययावत करायची आहेत, त्यांच्यासाठी ही सोय अत्यंत फायदेशीर ठरणार आहे. आधार सेवा घेताना काही तांत्रिक अडचण आल्यास किंवा संबंधित कार्यालयाकडून प्रतिसाद न मिळाल्यास, नागरिकांच्या मदतीसाठी ८२७५००२८०५ हा व्हॉट्सप हेल्पलाईन क्रमांक जारी करण्यात आला आहे. या क्रमांकावर संदेश पाठवून नागरिक आपली समस्या मांडू शकतात.

लातूर जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी आधारशी संबंधित कामांसाठी आपल्या जवळच्या टपाल कार्यालयाशी संपर्क साधून या शासकीय सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन लातूर विभागाचे सहाय्यक अधीक्षक (डाकघर) श्रीकांत माने यांनी केले आहे.

## आनंदवाडी येथे मोफत नेत्ररोग तपासणी



**अजगर मजकुरी/नळेगाव:** माझं गाव आरोग्यसंपन्न गाव हे अभियान गेले एक महिन्यापासून सुरू आहे. त्याचाच एक भाग म्हणून आज दिनांक ११/५/२०२६ वार - सोमवार सकाळी ११ वा. ग्रामपंचायत कार्यालय आनंदवाडी येथे नेत्र चिकित्सा मोतिबिंदू शस्त्रक्रिया शिबिर संपन्न झाले. या शिबिराचे उद्घाटन शिरूर अनंतपाळ ग्रामिण रूग्णालयाचे वैद्यकीय अधिक्षक डॉ. अनंत पूरी साहेब, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. देशमुख साहेब, नेत्र चिकित्सक डॉ. रमेश पाटील, संकेत लंपाटे नेत्र चिकित्सा अधिकारी ग्रामिण रूग्णालयात शि.अ., संदिप कोठारे साहेब. आदी मान्यवरांच्या हस्ते झाले. या शिबिरामध्ये पुरूष महिला असे एकूण ८७ रूग्णानी तपासणी करून घेतले. मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात साठी २९ पात्र झाले. आजच शस्त्रक्रिया करण्यासाठी १५ रूग्णांना नेण्यात आले. उर्वरित पेशंट ला शस्त्रक्रिया करण्यासाठी उद्या नेण्यात येणार आहे. या कार्यक्रमाला उपस्थित सरपंच तथा शिवसेनेचे तालुकाप्रमुख भागवत वंगे, ग्रामविकास अधिकारी संजय रोडेवाड, अनुसया पेद्देवाड आशा कार्यकर्ती, उपसरपंच व्यंकट कल्ले, अनुसया शिरूरे बचत गट प्रमुख,सदस्य ज्ञानोबा शेळके, लक्ष्मण नाटकरे, राजिव दिवेकर ,हरिश्चंद्र कोले, गोपाळ भूसागरे, रंजित मरे, मारोती बनसोडे, बळवंत शिरूरे, बाबूराव व्यंजने, बाबू कोल्हे,तूकाराम बनसोडे, बाळू सुर्यवंशी, आदी गावातील नागरिक महिला उपस्थित होते.

## विद्यार्थ्यांचे यश हे विद्यार्थी, शाळा, आणि पालकांच्या संयुक्त प्रयत्नाचे फलित : कालिदास माने

### सानेगुरुजी माध्यमिक विदयालयात १० वी गुणवंताचा सत्कार संपन्न

**लातूर/प्रतिनिधी :** इयत्ता दहावीतील विद्यार्थ्यांचे यश हे विद्यार्थी, शाळा आणि पालकांच्या संयुक्त प्रयत्नाचे फलित असून हे यश इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी असून भविष्यातही असेच यश संपादन करून शाळेचे व पालकाचे नाव उज्वल करावे असे गौरवद्गार संस्था सचिव कालिदासजी माने यांनी काढले. ते साने गुरुजी माध्यमिक विद्यालयाच्या वतीने आयोजित गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळ्यात उद्धाटक म्हणून बोलत होते.

पुढे बोलताना म्हणाले की, गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार म्हणजे त्यांच्या मेहनतीचा सन्मान आहे विद्यार्थ्यांनी जिद्द, चिकाटी आणि आत्मविश्वासाच्या




जोरावर मिळवलेल्या यशाचा गौरव करणे ही शाळेची जबाबदारी तर या गुणवत्तेत सातत्य ठेवणे विद्यार्थ्यांची जबाबदारी आहे. या गुणवंत सत्कार सोहळ्याच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून प्रशासकीय अधिकारी गोविंद माने, उद्धाटक म्हणून संस्था सचिव कालिदासजी माने तर प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज माने, विलासराव देशमुख क. महाविद्यालयाचे प्राचार्य विवेक माने, प्रशासकीय अधिकारी नागोराव कांबळे व उषा आडे, स्व. ज्ञानदेवराव माने ज्यू. कॉलेजचे प्राचार्य शरद चव्हाण, नंदादीप माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक श्रीनिवास राऊत व मुख्याध्यापक इस्माईल शेख, आदी उपस्थित होते.

या सत्कार सोहळ्यात शाळेतून अनुक्रमे प्रथम, द्वितीय आणि तृतीय आलेल्या महेश मोहन मरसोने, अनुकल्प तुकाराम लोणे आणि बुशरा इम्रानपाशा शेख यांचा प्रमुख पाहुण्याच्या हस्ते सन्मान करून शुभेच्छा देण्यात आल्या. तसेच विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झालेल्या मारोती महादेव जाधव, सुशांत सुधाकर राठोड, महेश्वरी बालाजी आलुरे, प्रांजली नामदेव सूर्यवंशी, प्रशांत राजेश नांदुरे, अभय राम गुडले, श्रद्धा संभाजी बुगनर, गणेश गोपीनाथ ठाकूर, प्राची दादाराव सालगुडे या विद्यार्थ्यांचाही सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक इस्माईल शेख यांनी केले तर सूत्रसंचलन गणेश परळे व आभार वैभव धोत्रे यांनी मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कावळे स्मिता, परळे गणेश, धोत्रे वैभव, गायकवाड राहुल, माने सचिन, जगताप शिवगंगा, काळगापुरे कमल, यादव मिनाक्षी, पवार शशिकांत, डोनगावे कोमल, गायकवाड सतीश, पवार अमोल, पाटील सुनंदा, वडवळे नवनाथ, दयानंद लहाडे, बनसोडे पोर्णिमा, सूर्यवंशी भरत, जाधव सत्यपाल, सावंत बालाजी, सुडे दत्तात्रय, पांचाळ सुर्यकांत आदि सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## आसाम सरकारच्या महत्त्वाकांक्षी राष्ट्रीय प्रकल्पात डॉ. प्रा. खलील सिद्दीकी यांची प्रतसंपादकपदी नियुक्ती


**लातूर/प्रतिनिधी :** पानगाव ता रेणापूर येथील रहिवासी व हिंदुस्तानी एज्युकेशन सोसायटी औसा येथील पर्यवेक्षक पदावर कार्यरत असलेले ज्येष्ठ साहित्यिक, शिक्षणतज्ज्ञ, कवी आणि प्रख्यात लेखक डॉ. प्रा. खलील सिद्दीकी यांची आसाम सरकारच्या उच्च शिक्षण विभागांतर्गत कार्यरत असलेल्या पब्लिकेशन बोर्ड आसाम या प्रतिष्ठित संस्थेच्या राष्ट्रीय भाषांतर प्रकल्पासाठी उर्दू भाषेचे प्रतसंपादक (कॉपी एडिटर) म्हणून अधिकृत नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या या निवडीमुळे मराठवाड्यासह संपूर्ण महाराष्ट्राच्या साहित्य व शैक्षणिक क्षेत्रात अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

पब्लिकेशन बोर्ड आसामचे सचिव प्रमोद कलिता यांनी अधिकृत पत्राद्वारे ही नियुक्ती जाहीर केली. या पत्रानुसार, प्रख्यात लेखक डॉ. समुद्रगुप्त कश्यप लिखित महापुरुष श्रीमंत शंकरदेव या महत्त्वपूर्ण ग्रंथाचे भारतातील विविध प्रमुख भाषांमध्ये भाषांतर व प्रकाशन करण्यात येणार आहे. आसामचे मुख्यमंत्री डॉ. हिमंता बिस्व सरमा यांनी या प्रकल्पात विशेष रस दाखविला असून भारतीय सांस्कृतिक वारसा आणि संतपरंपरेचा संदेश देशभर पोहोचविण्याचा हा महत्त्वाकांक्षी उपक्रम मानला जात आहे.

या राष्ट्रीय स्तरावरील प्रकल्पासाठी उर्दू भाषेच्या प्रतसंपादनाची जबाबदारी डॉ. प्रा. खलील सिद्दीकी यांच्याकडे सोपविण्यात आली आहे. भाषेवरील प्रभुत्व, साहित्यिक जाण, संशोधनात्मक दृष्टी आणि विविध भाषांतील अभ्यास या गुणांच्या आधारे त्यांची निवड करण्यात आल्याचे सांगण्यात आले.

डॉ. प्रा. खलील सिद्दीकी हे शिक्षण, साहित्य, संशोधन आणि पत्रकारिता क्षेत्रात दीर्घकाळ कार्यरत आहेत. त्यांनी मराठी, उर्दू, हिंदी, इंग्रजी आणि फारसी अशा विविध भाषांमध्ये उल्लेखनीय लेखन केले असून आतापर्यंत त्यांच्या २८ पुस्तकांचे प्रकाशन झाले आहे. त्यांच्या साहित्यामध्ये सामाजिक जाणीव, मानवी मूल्ये, प्रेम, सांस्कृतिक समन्वय आणि आधुनिक विचारांचे दर्शन घडते. ते उत्तम वक्ते म्हणूनही परिचित असून विविध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय साहित्य संमेलनांमध्ये त्यांनी सहभाग नोंदविला आहे.

डॉ. सिद्दीकी यांना अनेक साहित्यिक, शैक्षणिक आणि सामाजिक पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे. विविध मासिकांचे संपादन, संशोधनपर लेखन आणि नवोदित लेखकांना मार्गदर्शन करण्याचे कार्यही ते सातत्याने करीत आहेत. मराठवाड्यातील साहित्यिक चळवळीमध्ये त्यांचे योगदान उल्लेखनीय मानले जाते.



त्यांच्या या नियुक्तीबद्दल साहित्यिक, शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांनी अभिनंदन केले आहे. हिंदुस्तानी एज्युकेशन सोसायटीचे पदाधिकारी, शिक्षक, विद्यार्थी तसेच विविध साहित्य संस्थांनीही आनंद व्यक्त केला आहे. राष्ट्रीय स्तरावरील या महत्त्वपूर्ण प्रकल्पात मराठवाड्यातील एका साहित्यिकाची निवड होणे ही संपूर्ण प्रदेशासाठी गौरवाची बाब असल्याची भावना व्यक्त होत आहे.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.




शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडेऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष संजय भोकरे यांना झेड प्लस सुरक्षा देण्याची मागणी: लातूर पत्रकार संघाचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**लातूर/प्रतिनिधी:** ज्येष्ठ पत्रकार,महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष तथा राज्य संघटक संजय भोकरे यांना जीवे मारण्याचा कट उघड झाल्याने त्यांना तातडीने झेड प्लस सुरक्षा देण्याची मागणी लातूर पत्रकार संघाच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्र्यांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई जिल्हा शाखा लातूरच्या वतीने देण्यात आलेल्या निवेदनात म्हंटले आहे, पत्रकार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष तथा राज्य संघटक आणि सांगली येथील अंबाबाई तालीम संस्थेचे अध्यक्ष व दैनिक महानगरी व दैनिक जनप्रवास दैनिकाचे समूह संपादक संजय भोकरे यांच्या हत्येचा कट सांगली पोलिसांनी नुकताच उधळून लावला आहे. या



प्रकरणात पोलिसांनी तीन आरोपींना अटक केली असून त्यांच्याकडून दोन देशी बनावटीची पिस्तूलं, चार जिवंत काडतूसं आणि धारदार चाकू जप्त केला आहे. पोलीस तपासात असे निष्पन्न झाले आहे की, हे आरोपी फेब्रुवारी महिन्यापासून श्री. भोकरे यांची रेकी करत होते.विशेष म्हणजे, अशाच प्रकारे साधारण वर्षभरापूर्वी त्यांचा मुलगा श्री. सिद्धार्थ संजय भोकरे यांना देखील जीवे मारण्यासाठी पुण्यामधून कट रचण्यात आला होता आणि त्या संदर्भात त्यांना धमकीचे पत्रही प्राप्त झाले होते. यावरून हे स्पष्ट होते की, भोकरे कुटुंबीय हे गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांच्या निशाण्यावर आहेत.या हल्ल्याचा कट उघड झाल्यानंतर भोकरे यांनी स्वतः 'प्लॅन बी' नुसार पुन्हा हल्ला होण्याची दाट शक्यता व्यक्त केली आहे. गुन्हेगारांचे धाडस पाहता, त्यांचा 'प्लॅन बी' कार्यान्वित होण्यापूर्वीच शासनाने कठोर पावले उचलणे गरजेचे आहे. अंबाबाई तालीम संस्थेच्या जमिनी हडपण्याच्या उद्देशाने हा सर्व प्रकार सुरू असल्याचे प्राथमिक तपासात दिसत आहे. निवेदनावर महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबईचे प्रदेश उपाध्यक्ष तथा लातूर जिल्हाध्यक्ष अशोक देडे, जिल्हा कार्याध्यक्ष अफसर कारभारी, जिल्हा सचिव अशोक हनवते, शहर जिल्हाध्यक्ष महादेव डोंबे, डिजिटल विभागाचे जिल्हाध्यक्ष मनिष हजारे, इले. विभाग जिल्हाप्रमुख हारून मोमीन, जिल्हा कार्यकारिणी सदस्य रामप्रसाद काबरा, मारोती काळे, बालाजी जगदाळे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

श्री.भोकरे यांच्या जिवाला असलेला गंभीर धोका लक्षात घेऊन त्यांना तातडीने झेड प्लस संरक्षण प्रदान करण्यात यावे, वर्षभरापूर्वी सिद्धार्थ भोकरे यांना मिळालेल्या धमकीचा आणि आताच्या कटाचा आपसात काही संबंध आहे का, याची सखोल चौकशी व्हावी, या प्रकरणातील मुख्य सूत्रधार आणि कटामागील मूळ 'बोलवता धनी' कोण आहे, याचा शोध घेऊन त्यांच्यावर कडक कारवाई करण्यात यावी.

## कमल नारायण तावदार यांचे निधन



**लातूर/प्रतिनिधी** : लातूर येथील रहिवाशी कमल नारायण तावदार वय ८४ यांचे मंगळवार दि. १२ मे २०२६ रोजी दुपारी २.४० वाजता निधन झाले. त्यांच्यावर बुधवार दि. १३ मे रोजी सकाळी दहा वाजता लातूर जवळील नांदगाव वेस येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आला. त्यांच्या पश्चात सुन, दोन मुली, जावई व नातवंडे असा त्यांचा परिवार आहे.

# शिवसेनेच्या वतीने गाव तेथे शाखा व घर तेथे शिवसैनिक अभियान राबविणार: बाबुराव शेळके



**लातूर/प्रतिनिधी:** आगामी काळात शहर विधानसभा मतदारसंघात गाव तेथे शाखा व घर तेथे शिवसैनिक हे अभियान लातूर शहर मतदारसंघात राबविण्यात येणार असून लातूर शहर मतदार संघात शिवसेनेची बांधणी भक्कमपणे करून येथे सेनेला चांगले दिवस आणून देण्याचा प्रामाणिक प्रयत्न करू असे प्रतिपादन शिवसेना तालुकाप्रमुख बाबुराव शेळके यांनी लातूर येथे आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत बोलताना केले.

यावेळी शिवसेनेची बुलंद तोफ सोमनाथ स्वामी डिगोळकर, लातूर शहरप्रमुख मोहन दिवटे, शिवसेना पदाधिकारी संतोष पाटील, बाळासाहेब दंडिमे आदी उपस्थित होते.

पुढे बोलतांना शेळके म्हणाले की,येणाऱ्या काळामध्ये शिवसेनेची पाळामुळे घराघरापर्यंत पोहोचले पाहिजेत आणि शिवसेना मोठ्या प्रमाणात वाढली पाहिजे यासाठी जीवांचे रान करून शिवसेनेचा भगवा झेंडा आगामी काळात लातूर शहर महापालिका व लातूर शहर विधानसभेत फडकावण्याचा मानस असून त्यासाठी गावागावात शिवसेनेची शाखा व शहरातील प्रभागांमध्ये शिवसेना शाखेचे बांधणी करून येणाऱ्या काळामध्ये शिवसेनेच्या पन्नास शाखा शिवसेना शहर मतदार संघामध्ये स्थापना करण्यासाठी प्रयत्न करणार असून पन्नासाव्या शाखेच्या उद्घाटनासाठी शिवसेनेचे लोकप्रिय खासदार युवा नेते डॉ श्रीकांत शिंदे साहेब यांना आणण्याचा आम्ही प्रयत्नशील राहू.यावेळी प्रास्ताविकात सोमनाथ स्वामी डिगोळकर यांनी शिवसेनेचे मुख्य नेते पक्षप्रमुख व राज्याचे कर्तबगार उपमुख्यमंत्री मा ना एकनाथराव शिंदे साहेब यांच्या मुख्यमंत्री पदाच्या कार्यकाळात केलेल्या जनकल्याणकारी योजनेची माहिती देवून सामान्य माणसाच्या हितासाठी भरीव असे कार्य झाल्याचे सांगुन, पक्ष वाढीसाठी आगामी काळात मोठ्या गतीने प्रयत्न केले जाणार असल्याचे नमुद केले.तसेच शिवसेना पक्ष वाढीसाठी लातूर शहरात प्रभावीपणे कार्य करू यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत अशी माहिती मोहन दिवटे यांनी यावेळी पत्रकारांना दिली.

# लातूर ग्रामीण मतदार संघातील एकोणीस देवस्थानांना आ. रमेशआप्पा कराड यांच्या प्रयत्नातून 'क' दर्जा प्राप्त

**लातूर/प्रतिनिधी:** लातूर जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या प्रयत्नातून लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील विविध गावातील एकोणीस देवस्थानांना तीर्थक्षेत्र विकासाचा क दर्जा प्राप्त झाला आहे. क दर्जा प्राप्त झाल्याने त्या त्या गावातील देवस्थानाचा सर्वांगीन विकास होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री ना. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या अध्यक्षतेखाली नुकत्याच झालेल्या लातूर जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत विविध विकास कामांना मान्यता देण्यात आली आहे. लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांनी लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील विविध गावच्या विविध देवस्थानांना तीर्थक्षेत्र विकासाचा क दर्जा देऊन भाविक भक्तांसाठी सोयीसुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी केली होती.



आ. रमेशआप्पा कराड यांच्या मागणीनुसार लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील श्री विठ्ठल रुक्मिणी देवस्थान जवळा बु, श्री संत माधव मामा ज्ञानेश्वरी संस्थान मठ पानगाव, श्री विघ्नहर्ता दत्त मंदिर भाडगाव, श्री गुप्तलिंग महादेव मंदिर दगडवाडी, श्री मुकुट शहावली दर्गा मुशिराबाद, श्री खंडोबा मंदिर बिंदगीहाळ, श्री मनमत स्वामी देवस्थान भातांगळी, श्री लक्ष्मी मंदिर बोकणगाव, श्री महेबूब सुबानी दर्गा बोरी, श्री आत्मलिंगेश्वर महादेव मंदिर बोरी, श्रीकृष्ण मंदिर उमरगा, श्री खंडोबा मंदिर बामणी, श्री काशीविश्वेश्वर विठ्ठल रुक्मिणी मंदिर भडी, श्री खंडोबा मंदिर भातखेडा, श्री हनुमान मंदिर चिकलठाणा, श्री खंडोबा मंदिर भातांगळी, श्री विठ्ठल मंदिर ममदापूरपाटी, श्री नत्तरशहाबाबा दर्गा बोरी, श्री खंडोबा मंदिर ममदापूर अशा एकूण एकोणीस विविध देवस्थानचा शासनाच्या तीर्थक्षेत्र विकास योजनेत समावेश करण्यात आला आहे.

लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील तब्बल एकोणीस विविध देवस्थानांना तीर्थक्षेत्र विकास योजनेचा क दर्जा मिळवून दिल्याबद्दल भाजप नेते आ. रमेशआप्पा कराड यांचे त्या त्या गावातील भाजपाच्या कार्यकर्त्यांसह ग्रामस्थांनी आभार व्यक्त केले आहेत.

रोज वाचा ऑनलाईन
लातूर समाचार
www.latursamachar.com

## पाणी गुर्मी ..

पाणी अपव्यय करी
आपण किती गुर्मीत
पाणी पाणी जीव हो
अशा दुष्काळ गर्मीत

भीषण पाणी टंचाई
भासते मनुज निर्मीत
आत्मघात करी नीत
विचीत्रवृत्ती कुकर्मित

टँकर्स पाणी पुरवठा
केला जातो नियमित
कुठून भरतात टँकर्स
असूनि साठा सीमीत

पाणी गळती चालली
पाईपफुटतात अमित
जिभा पडलेल्याशुष्क
जल गायब हो भूमीत

नळ बंद करायचे राहे
रे विसरतो धामधुमीत
टँकर्समाफिया धंद्यास
झळाळी ये चमचमीत

वॉटर पार्क वाढू लागे
पाणी व्यय अपरिमीत
ओसंडून वाहतेयं गर्दी
समस्या होते संभ्रमीत

रेन डान्स रंगात केवढे
धनाढ्य चेहरे सु स्मित
हंडेमोर्चे खेड्यापाड्या
विरोधा भास स्तिमित

स्वच्छ स्विमिंग टँकस्
लोभसवाणे ते कामित
घामाचीआंघोळ करती
जन सामान्य अखंडित

**हेमंत मुसरीफ पुणे.**
९७३०३०६९९६.

# लातूरमध्ये दुसरे बौद्ध साहित्य संमेलन पार पडले

**लातूर/प्रतिनिधी:** तथागत गौतम बुध्द, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतीबा फुले व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त प्रज्ञासूर्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर साहित्य नगरी, भालचंद्र ब्लड बँक, लातूर या ठिकाणी, दुसरा बौद्ध साहित्य संमेलन आणि पुरस्कार वितरणाचा सोहळा झाला. लातूर नगरीच्या महापौर आयु. जयश्रीताई सोनकांबळे यांनी दीप प्रज्वलन करून या शानदार सोहळ्याचे उद्घाटन केले. याप्रसंगी विचारपिठावर संमेलन अध्यक्ष म्हणून लाभलेले ज्येष्ठ साहित्यिक डॉ. प्रशांत गायकवाड तसेच डॉ. नारायण कांबळे, डॉ .गिरीश मोरे,अमित मेधावी, डॉ. लहू वाघमारे ,प्रा. बापू गायकवाड यांच्यासह इतर साहित्यिक, कथा लेखक आणि कवी, तसेच संयोजन समितीचे अध्यक्ष चंद्रकांत शिंदे, कार्याध्यक्ष तथा संयोजक, संपादक राजेंद्र कांबळे उपाध्यक्ष, भगवान लोखंडे, सचिव यु.डी.गायकवाड, सहसचिव भगवान बनसोडे, जीजी कांबळे, मंगलताई कांबळे, शांत रक्षित सुरवसे, रवींद्र राजेगावकर, मारुती सर्वदे, राजेंद्र बनसोडे, नितीन गायकवाड यांच्यासह मोठ्या संख्येने जनसमुदाय उपस्थित होता.

यावेळी कार्यक्रमाची सुरूवात बुध्दीस्ट इंटरनॅशनल स्कूलच्या विद्यार्थ्यांनी गायलेल्या अतिशय सुंदर स्वागत गीताने झाली. उद्घाटन सत्रामध्ये या संमेलनाचे संमेलनाध्यक्ष म्हणून लाभलेले ,बौद्ध धम्माचे गाढे अभ्यासक डॉ. प्रशांत गायकवाड यांच्या बौद्ध धम्मावरील वैचारिक , सुंदर अध्यक्षीय भाषणानंतर प्रसिद्ध साहित्यिक अमित मेधावी यांनी




तथागत गौतम बुद्धाची स्त्री विषयक भूमिका तसेच प्रसिद्ध साहित्यिक आयु. डॉ. गिरीश मोरे यांनी गौतम बुद्धाचे प्रतिरोधाचे तत्त्वज्ञान, बापू गायकवाड यांनी कालामसुत: वर्तमान समाजाची गरज या विषयावर सखोल वैचारिक मांडणी केली तर मा.डॉ.नारायण कांबळे तसेच यु.डी. गायकवाड यांनीही यावेळी झालेल्या परिसंवादामध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. यावेळी झालेल्या पुरस्कार वितरण सोहळ्यात आयु. अनुपमा मुक्ताराम लामतुरे (बोरीकर), डॉ. प्रशांत मुगळे,प्रा. दत्तात्रय सूर्यवंशी,शांतरक्षित सूर्यवसे, सविता नितीन गायकवाड, रवींद्र राजेगावकर, कुमारी ऐश्वर्या सुशील चिकटे यांना प्रज्ञासूर्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर शिक्षणरत्न पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

तसेच सामाजिक क्षेत्रातून आंबेडकरी चळवळीतील विलास सूर्यवंशी, एन.डी., सोनकांबळे बापू साहेबराव खोसे, अनिल उत्तमराव हजारे यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले तर कविवर्य संजय घाडगे यांना महाकवी नामदेव ढसाळ हा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले, तर व्यावसायिक क्षेत्रातून मा इंजिनिअर दीपक कांबळे व राजेंद्र बनसोडे यांनाही पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आले. तर यावेळी अगदी खेळीमेळीच्या वातावरणामध्ये कथाकथन व कवी संमेलन उत्स्फूर्त पार पडले.

# विश्वेश्वर स्क्रिनींग टेस्ट २०२६ ला विद्यार्थ्यांचा उत्स्फुर्त प्रतिसाद

## तब्बल १२३५ विद्यार्थ्यांनी दिली परिक्षा

**औसा/प्रतिनिधी:** तालुक्यातील आलमला येथील विश्वेश्वर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित विश्वेश्वरय्या इन्स्टिटयुट ऑफ इंजिनीअरिंग ॲण्ड टेक्नॉलॉजी महाविद्यालयात इयत्ता १० वी व १२ वी उत्तीर्ण होणाया विद्यार्थ्याकरिता विश्वेश्वर स्क्रिनिंग टेस्टचे आयोजन करण्यात आले होते. १० वी नंतर पुढे काय या विद्यार्थ्यांच्या व पालकांच्या समोरील प्रश्नाकरिता महाविद्यालयाने १० वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना बुध्दीमत्ता, सामान्य ज्ञान, इंग्रजी व दहावीच्या अभ्यासक्रमावर आधारित विश्वेश्वर स्क्रिनींग टेस्ट २०२६ चे आयोजन तसेच १२ वी उत्तीर्ण विद्यार्थ्याकरिता १२ वी बोर्ड अभ्यासक्रमावर आधारित इंजिनीअरिंग व फार्मसी, ॲग्रीकल्चर प्रवेशाकरिता सखोल असे मार्गदर्शन विश्वेश्वर शैक्षणिक संकुलात ऑफलाईन पध्दतीच्या माध्यमातुन परिक्षा घेण्यात आली. या विश्वेश्वर स्क्रिनींग टेस्टसाठी मराठवाडयासह लातूर जिल्हा व परिसरातून १० वी पास ९५७ विद्यार्थ्यांनी या स्क्रिनींग टेस्ट परिक्षेमध्ये सहभाग नोंदविला तर १२ वी च्या २७८ विध्यार्थ्यांनी नावनोंदणी करून



दिनांक १० मे रोजी विश्वेश्वर संकुलात ऑफलाईन पध्दतीने परिक्षा दिली.

या कार्यक्रमामध्ये विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना १० वी नंतर पॉलिटेक्निक डिप्लोमा, ११ वी कॉमर्स, सायन्स, आयटीआय अशी अनेक दालने विद्यार्थ्यांना करिअरसाठी उपलब्ध असल्याचे सांगुन विद्यार्थ्यांना व पालकांना पडलेल्या प्रश्नाचे उत्तर म्हणुन १० वी नंतर असलेल्या शैक्षणिक संधी व त्यातुन मिळणाया नोकया व आजच्या स्पर्धेच्या युगात टिकण्यासाठी विद्यार्थ्यांनी काय केले पाहिजे या बद्दल सखोल असे मार्गदर्शन केले तसेच इंजिनीअरिंग करिअर हे पॉलिटेक्निक डिप्लोमा केल्याने कसे सोपे जाईल यावरही मार्गदर्शन केले व १२ वी नंतर इंजिनीअरिंग, फार्मसी, बिसीए, बि. कॉम प्रवेशासाठी सखोल असे मार्गदर्शन करण्यात आले व विश्वेश्वर शैक्षणिक संकुलात संस्थेच्या वतीने दिल्या जाणाया सेवा सुविधा व विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास होण्याकरिता राबविले जाणारे विविध उपक्रमाची माहिती देऊन पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

विश्वेश्वरय्या इंन्स्टिटयुट ऑफ इंजिनीअरिंग ॲण्ड टेक्नॉलॉजी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रशांत धाराशिवे यांनी मराठवाडा तसेच लातूर जिल्हा परिसरातुन आलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे स्वागत करून तुम्ही योग्य ठिकाणी आला आहात कारण येथे विद्यार्थ्यांच्या गुणात्मक वाढीबरोबरच सर्वांगिण विकास कसा साधला जाईल यासाठी महाविद्यालय अविरतपणे प्रयत्न करत असते. संस्थेच्या ब्रिदवाक्याप्रमाणे ज्ञान, विज्ञान व सुसंस्कारातुन शिक्षण महाविद्यालयातुन संस्काररुपी विद्यार्थी घडविण्याचे काम महाविद्यालय मागील दोन दशकापसुन करत आहे. आज महाविद्यालयातील विद्यार्थी शासकीय तसेच निमशासकीय व मल्टिनॅशनल कंपन्यामध्ये मोठया पदावर कार्यरत असणे हे महाविद्यालयाच्या यशाचे गमक असल्याचे सांगुन विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

या विश्वेश्वर स्क्रिनींग टेस्ट २०२६ चे आयोजन संस्थेचे सचिव बसवराज धाराशिवे, सहसचिव महादेव खिचडे यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वी करण्यासाठी विभागप्रमुख प्रा. प्रविण साबदे, प्रा. अंकुश बिडवे, प्रा. गोपाळ दंडिमे, प्रा. रेवणसिध्द बुक्का, प्रा. मंगेश बिडवे, प्रा. अब्दुल समद काझी, प्रा. संदेश माडे, प्रा. अजित लोकरे, विश्वेश्वर संकुलातील सर्व युनिटमधील प्राध्यापक वृंद व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

टोनर रिफिलिंग



फक्त ₹ ३००/-
मास्टरप्लेट
ट्रेसिंग क्वालिटी
संपर्क
8600025070
9028376965
प्रिंटर्स पॅराडाईस
प्रिंटर रिपेअरिंग
कॉम्पॅटिबल कार्ट्रिजेस
टोनर रिफिलिंग

निलंगा शहरातील
एलआयसी
विमा भरण्याचे केंद्र
सितारी विमा सेवा केंद्र
दु.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स,
जनता दवाखान्यासमोर
शिवाजी चौक, निलंगा.
वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत
जमीरोद्दीन सितारी
चेअरमन क्लक मेंबर CLIA
एजंट भरती चालू आहे.
संपर्क → Off: (02384) 242224,
9422612239,
9422658396

Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade Mo. 9422472502, RNI 47034/64, POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26
हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे. मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२ आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी–५२/२४–२६